

# स्पंदन

वर्ष १ ९८-

## दूधसाखर महाविद्यालय, बिद्री.



# सत्कार मूर्ती



मा. दिनकररावजी जाधव



मा. के. पी. पाटीलसो



मा. प्रविणसिंहजी पाटील



मा. नामदेवरावजी भोईटे



मा. के. डी. गोसावीसो



मा. एल. के. काळे-पाटीलसो

श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ बिद्री (मौनीनगर) संचलित

# दूधसाखर महाविद्यालय, बिद्री

(मौनीनगर), ता. कागल, जि. कोल्हापूर

'स्पंदन' साहित्य अंक सालात भारतातील जे थोर नेते, संशोधक,
शास्त्रज्ञ, लेखक, चित्रपट कलावंत, माजी विद्यार्थी व
आपल्या परिसरातील ज्ञात, अज्ञात लोक
दिवंगत झाले, त्यांच्या पवित्र स्मृतिस
अभिवादन करून आम्ही भावपूर्ण
श्रद्धांजली अर्पण
करीत आहेत !

श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ बिद्री (मौनीनगर) संचलित

# दूधसाखर महाविद्यालय, बिद्री

(मौनीनगर), ता. कागल, जि. कोल्हापूर

# ।। स्पंदन ।।

वार्षिक अंक चौथा

१९९५ - ९६


**संपादक मंडळ :**

अध्यक्ष - प्राचार्य शिवाजीराव पाटील

कार्यकारी संपादक - प्रा. नंदकुमार पाटील

सह - संपादक - प्रा. सतीश पाटील

**विभागीय संपादक :**

प्रा. संजय पाटील - मराठी

प्रा. सादिक देसाई - हिंदी

प्रा. श्रीकृष्ण साळोखे - इंग्रजी

**प्रकाशक :**

शिवाजीराव पाटील एम्.एस्सी.

प्राचार्य, दूधसाखर महाविद्यालय, बिद्री

**मुद्रक :**

श्री. जयसिंग पोवार

श्री मुद्रणालय, कोल्हापूर ☎ ६२०६९६

**मुखपृष्ठ :**

प्रा. नंदकुमार पाटील व संपादक मंडळ

॥ विद्या परम भूषणम् ॥

# श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री

## (मौनीनगर), ता. कागल, जि. कोल्हापूर

परिसराच्या आर्थिक उन्नतीबरोबरच शैक्षणिक विकास
व प्रगती साधावी या उदात्त हेतूने कार्यरत
असलेल्या आमच्या शैक्षणिक शाखा.

---

### दूधसाखर वरिष्ठ महाविद्यालय
(कला, विज्ञान)

---

### दूधसाखर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय
(कला, विज्ञान, वाणिज्य व व्यावसायिक)

---

### दूधसाखर सैनिक शाळा प्रवेश तयारी वर्ग

---

### दूधसाखर विद्यानिकेतन
(प्राथमिक विभाग)

---

**▶ ठळक वैशिष्ट्ये ◀**

- सर्वच शैक्षणिक शाखांसाठी भव्य व सुसज्ज इमारती
- उच्च गुणवत्ताप्राप्त शिक्षक वर्ग
- शिक्षण, कला क्रीडा व संस्कार यासाठी वैयक्तिक व विशेष लक्ष.
- अद्यावत सुसज्ज ग्रंथालय, प्रयोगशाळा, क्रीडांगण व अभ्यासिकेची स्वतंत्र सोय.
- शांत निसर्गरम्य परिसर.

मा. प्रविणसिंहजी पाटील
उपाध्यक्ष

मा. के. पी. पाटील
अध्यक्ष

मा. के. डी. गोसावी
सेक्रेटरी

मा. एल. के. काळे-पाटील
जनरल सेक्रेटरी

# दूधसाखर महाविद्यालय, बिद्री

## प्राध्यापक वृंद : ९५ - ९६

प्राचार्य एस. के. पाटील एम.एस्सी.

### मराठी :

| | |
|---|---|
| प्रा. एस्. डी. पाटील | एम्.ए. बी.ड. एम्.फील. |
| प्रा. ए. जे. वारके | एम्.ए. बी.एड.(सेट) |

### हिंदी :

| | |
|---|---|
| प्रा. एस्. बी. देसाई | एम्.ए. एम्.फील. |
| प्रा. डी. जी. दिघे | एम.ए. |

### इंग्रजी :

| | |
|---|---|
| प्रा. सी. वाय्. जाधव | एम्.ए. |
| प्रा. डी. एन्. पाटील | एम्.ए. |
| प्रा. एस्. ए. साळोखे | एम्.ए. एम्.एड |

### इतिहास :

| | |
|---|---|
| प्रा. एस्. आर. पाटील | एम्.ए. |
| प्रा. ए. आर. माने | एम्.ए.(सेट) |

### समाजशास्त्र :

| | |
|---|---|
| प्रा. डी. के. शिंदे | एम्.ए. एम्.फील. |
| प्रा. ए. डी. जानवे | एम्.ए. |

### अर्थशास्त्र :

| | |
|---|---|
| प्रा. एल्. एस्. करपे | एम्.ए. बी.एड्. |

### राज्यशास्त्र :

| | |
|---|---|
| प्रा. पी. एस्. पाटील | एम्.ए. |
| प्रा. ए. बी. माने | एम्.ए. |

### भूगोल :

| | |
|---|---|
| प्रा. सी. बी. कमाने | एम्.ए. |

### शारीरिक शिक्षण संचालक :

| | |
|---|---|
| प्रा. एन्. डी. पाटील | एम्.पी.एड्. |

### पदार्थ विज्ञान :

| | |
|---|---|
| प्रा. एच्. डी. धायगुडे | एम्.एस्सी. |
| प्रा. एस्. एन्. कुलकर्णी | एम.एस्सी. |
| प्रा. एम्. व्ही. टाकळे | एम्.एस्सी. |
| प्रा. एस्. ए. गंगावणे | एम्.एस्सी. |

### रसायनशास्त्र :

| | |
|---|---|
| प्रा. एस्. एन्. झेंडे | एम्.एस्सी. |
| प्रा. आर. बी. चोपडे | एस्.एस्सी. |
| प्रा. एस्. के. सावंत | एम्.एस्सी. |
| प्रा. एस्. जी. खानापुरे | एम्.एस्सी. |
| प्रा. ए. एस्. बागवान | एम्.एस्सी. |

### वनस्पतीशास्त्र :

| | |
|---|---|
| प्रा. डॉ. एस्. जी. गायकवाड | एम्.एस्सी. पी.एच्.डी. |
| प्रा. एस्. एस्. पाटील | एम्.एस्सी. एम्.फील. |
| प्रा. कु. जे. एम्. पाटील | एम्.एस्सी. |
| प्रा. पी. बी. पाटील | एम्.एस्सी. |

### प्राणीशास्त्र :

| | |
|---|---|
| प्रा. आर. एस्. पाटील | एम्.एस्सी. |

### गणित :

| | |
|---|---|
| प्रा. डी. डी. कोमेजवार | एम्.एस्सी. एम्.फील |

### संख्याशास्त्र :

| | |
|---|---|
| प्रा. वाय्. एस्. पाटील | एम्.एस्सी. |
| प्रा. एस्. एच्. पाटील | एम्.एस्सी. |

### ग्रंथपाल :

| | |
|---|---|
| प्रा. ए. टी. वागरे | एम्.ए. बी.लीब सायन्स |

### शिक्षकेत्तर कर्मचारी :

### कार्यालय :

| | |
|---|---|
| श्री. पी. व्ही. पाटील | एम्.कॉम. |
| श्री. एम्. के. भोईटे | बी.कॉम. |
| श्री. आर. एच्. कंकाळ | बी.कॉम. |
| श्री. व्ही. एस्. आबीटकर | एच्.एस्.सी. |
| श्री. आर. एम्. देसाई | बी.ए. |

### प्रयोगशाळा सहाय्यक :

| | |
|---|---|
| श्री. एस्. के. पाटील | बी.ए. |

### प्रयोगशाळा परिसर :

| | |
|---|---|
| श्री. व्ही. डी. तळेकर | |
| श्री. बी. एस्. सुतार | |
| श्री. आर. पी. आळवेकर | |
| श्री. अे. एम्. घुंगरे-पाटील | |
| श्री. एन्. एस्. वारके | बी.ए. |
| श्री. एस्. टी. जोशी | |
| श्री. एन्. व्ही. पाटील | |
| श्री. अे. बी. हवालदार | |

श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीनगर) संचलित

# दूधसाखर महाविद्यालय, बिद्री

(मौनीनगर), ता. कागल, जि. कोल्हापूर

|| विद्या परम् भूषणम् ||

# || स्पंदन ||

## चौथा वार्षिक अंक

१९९५ - ९६

## दि प्रेस अँड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स अॅक्ट नियम ८, फॉर्म नं. ४ प्रमाणे आवश्यक असलेली माहिती

# ॥ स्पंदन ॥


| | |
|---|---|
| प्रकाशन स्थळ - | दूधसाखर महाविद्यालय, बिद्री |
| प्रकाशन काळ - | वार्षिक |
| मुद्रकाचे नाव - | श्री. जयसिंग पोवार |
| राष्ट्रीयत्व - | भारतीय |
| पत्ता - | ११६, पद्माराजे गार्डन नजीक, शिवाजी पेठ, कोल्हापूर |
| प्रकाशकाचे नाव - | प्राचार्य शिवाजीराव पाटील |
| राष्ट्रीयत्व - | भारतीय |
| पत्ता - | दूध साखर महाविद्यालय, बिद्री |
| संपादाकाचे नाव - | प्रा. नंदकुमार पाटील |
| राष्ट्रीयत्व - | भारतीय |
| पत्ता - | दूधसाखर महाविद्यालय, बिद्री |
| मालकी - | दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ |

मी शिवाजीराव पाटील जाहीर करतो की वरील माहिती माझ्या समजूतीप्रमाणे बरोबर. आहे.

शिवाजीराव पाटील
प्राचार्य



या अंकातील लेखकांच्या मताशी प्रकाशक व संपादक सहमत असतीलच असे नाही.

(FOR PRIVATE CIRCULATION ONLY)

श्री दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना लि. बिद्री
श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीनगर)
ता. कागल, जि. कोल्हापूर.

## मान्यवर संचालक मंडळ



अध्यक्ष
**मा. के. पी. पाटीलसो**



उपाध्यक्ष
**मा. प्रविणसिंहजी पाटील**



मा. आमदार
**नामदेवरावजी भोईटे**
राधानगरी भुदरगड

## श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीनगर) संचलित
## दूधसाखर महाविद्यालय, बिद्री (मौनीनगर) ता. कागल.



माजी अध्यक्ष
**मा. दिनकररावजी जाधव**



कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ,
**मा. डी. एन्. धनागरेसो**



चेअरमन,
युनायटेड डिस्टलरी लि. परीते
**मा. विजयसिंहजी मोरे**



संस्था सचिव
**मा. के. डी. गोसावीसो**



प्राचार्य
**मा. शिवाजीराव पाटील**



कार्यकारी संचालक व मानद सचिव
**मा. एल. के. काळेपाटीलसो**

## श्री. दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना लि., बिद्री.
## मान्यवर संचालक मंडळ.


मा. नं. बा. सूर्यवंशी
(पनोरी)


मा. बा. ब. पाटील
(कपिलेश्वर)


मा. मा. गो. फराकटे
(क॥ वाळवे)


मा. ज्ञा. गुं. फराकटे
(बोरवडे)


मा. सु. द. सूर्यवंशी
(निढोरी)


मा. रा. दौ. पाटील
(कुरुकली)


मा. र. ग. पाटील
( आकुर्डे)


मा. म. कि. बारदेस्कर
(शेणगांव)

## श्री. दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना लि., बिद्री.

## मान्यवर संचालक मंडळ.



मा. ना. कों चौगले
(निगवे खालसा)



मा. के. गो. नांदेकर
(तिरवडे)



मा. चं. जो. वाडेकर
(मुरगूड)



मा. वि. द. कांबळे
(निळपण)



मा. बा. शं. पाटील
(दारवाड)



मा. रा. सो. पाटील
(सुरुपली)

## सन्माननीय महिला संचलिका



मा. सौ. वि. अ. चव्हाण
(सावर्डे पाटणकर)



मा. सौ. मा. पां. पाटील
(बिद्री)



# ।। मराठी विभाग ।।

आम्हां घरी धन शब्दांचीच रत्नें ।
शब्दांचींच शास्त्रें यत्न करुं ॥ १ ॥

शब्दचि आमुच्या जीवाचें जीवन ।
शब्दें वाटूं धन जनलोकां ॥ २ ॥

तुका म्हणे पहा शब्दची हा देव ।
शब्देंचि गौरव पूजा करुं ॥ ३ ॥

■ संत तुकाराम

■ विभागीय संपादक ■

प्रा. संजय पाटील

# अनुक्रमणिका

❑ कविता -


| | | | |
|---|---|---|---|
| १) | तुम्हीच आहात तुमच्या जीवनाचे | संदीप गुरव | बी.ए. -१ |
| २) | ती | इंद्रजीत पाटील | बी.ए. -१ |
| ३) | सद्गुण | जितेंद्र डवर | बी.ए. -२ |
| ४) | काही शब्द | कु. रेहाना जमादार | बी.एस्सी. -३ |
| ५) | फाशी | रणजीत देसाई | बी.एस्सी. -३ |
| ६) | जीवन | विनायक पाटील | बी.ए. -१ |
| ७) | गुरुत्वाकर्षण | कु. कविता सातुसे | बी.ए. -१ |
| ८) | घागर में सागर | नामदेव लोंढे | बी.ए. -१ |
| ९) | दिवाना | संजय पाटील | बी.ए. -२ |
| १०) | निरोप | पी. आर. दळवी | बी.एस्सी. -३ |
| ११) | सजनी | एस्. व्ही. पाटील | बी.एस्सी. -१ |
| १२) | पांथस्थ | सागर पाटील | बी.ए. -२ |
| १३) | पावसाची सर | अजित फराकटे | बी.ए. -१ |
| १४) | आजचा साधू | शंकर चव्हाण | बी.ए. -१ |
| १५) | बाजार | कु. मंगल मांडवकर | बी.ए. -१ |
| १६) | तुमच्या आशीर्वादानं | संतोष मोरबाळे | बी.ए. -१ |
| १७) | अजून वाटते | सर्जेराव यादव | बी.ए. -१ |
| १८) | निरोप | गजानन कदम | बी.एस्सी. -३ |
| १९) | स्मृती तरंगिणी | अशोक कदम | बी.ए. -२ |
| २०) | प्रेम | कु. अंजना राजनाने | बी.ए. -२ |
| २१) | चेहरा | व्ही. एम्. पाटील | बी.ए. -१ |
| २२) | हे ठरवायच असतं | पांडुरंग चिंदगे | बी.ए. -३ |
| २३) | या संसारी .......... | कु. सुजाता माने | बी.ए. -२ |
| २४) | प्रेमासाठी वाटेल ते | नामदेव मांडवकर | बी.ए. -१ |
| २५) | आई | कु. द्रौपदी कळिंद्रे | बी.ए. -३ |

# संपादकीय....

श्री संत शिरोमणी ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन शताब्दी वर्षात 'स्पंदन' हा अंक आपल्या हाती देताना फार आनंद वाटतो.

मानवी जीवनामध्ये संघर्षमय वातावरण निर्माण झाले आहे. असे का? याचा पारदर्शी मागोवा घेण्याचा प्रयत्न आमच्या विद्यार्थी/विद्यार्थिनींनी या अंकात केला आहे. असे करताना त्यांच्या अंगी असणारे कलागुण काही वेळा त्यांच्या स्वतंत्र प्रतिभेचा तर काही वेळा त्यांच्या लेखनानुकरणाने त्यांनी स्वतंत्र प्रतिभेला केलेले आवाहन आहे असे वाटते.



विद्यार्थ्यांच्या या साहित्य व कलागुणांची वाढ करण्यासाठी यंदा वर्षभर भित्तीपत्रकाचे वेगवेगळ्या प्रकारचे अंक प्रसिध्द करण्यात आले. त्याच अंकातील साहित्य व कलेच्या प्रकारास या अंकातून प्रसिध्दी दिली आहे. वर्षभर राबविलेल्या या उपक्रमास विद्यार्थी/विद्यार्थिनींनी दाखविलेली चिकित्सक व दूरदर्शीपणाची वृत्ती यामुळे हा अंक बहारदार व रंगतदार झाला आहे.

शिवाय पदभ्रमंती, राष्ट्रीय सेवा योजना, विविधगुणदर्शन या उपक्रमात विद्यार्थी/विद्यार्थिनींचा असलेला स्फूरणीय वाटतो. क्रीडा व विद्यापीठ परिक्षेत त्यांनी मिळविलेले यश विशेष वाटते. आपल्या ग्रामीण परिसरातील विद्यार्थ्याला सुसंस्कारीत करण्यासाठी मा. प्राचार्य यांची चाललेली धडपड म्हणजे हे यश. असेच गुणवान विद्यार्थी निर्माण करण्यासाठी मा. प्राचार्य यांनी आमचा आधार व्हावे ही अपेक्षा!

अंकासाठी मा. प्राचार्य, सदस्य व अनेकांचे जे सहकार्य लाभले त्याबद्दल ऋणी आहे. अंकातील सर्व गोष्टीचे श्रेय आपल्या सर्वांचे आहे. चुकांची बेरीज स्वत:कडे घेऊन सर्वांचे आभार!

संपादक,

प्रा. एन्. डी. पाटील

| | | |
|---|---|---|
| २६) होय आम्हाला पेंशन हवाय .... | संभाजी पाटील | बी.ए. -१ |
| २७) सांगाल का बाई | संदीप कदम | बी.ए. -२ |
| २८) मॅडम | कु. गोकुळा चौगले | बी.ए. -२ |
| २९) प्रेमजीवन | सुरेश लोंढे | बी.ए. -३ |
| ३०) सरिता | दामोदर कांबळे | बी.ए. -३ |
| ३१) लाख चुका करीन | संदीप पाटील | बी.ए. -२ |
| ३२) किमया श्रावणाची | श्रीधर जोईल | बी.ए. -२ |
| ३३) कटाक्ष | शिवाजी बोटे | बी.एस्सी. -३ |
| ३४) वारा पाऊस | कु. अश्विनी माजगांवकर | बी.ए. -१ |
| ३५) रिझर्व्हेशन | अजय देसाई | बी.ए. -३ |
| ३६) फुलराणी | कृष्णा पाटील | बी.ए. -२ |
| ३७) आई एक महान दैवत | संतोष ढवण | बी.ए. -२ |
| ३८) निरोप | राजन परवळेकर | बी.एस्सी. -३ |

❑ लेख -

| | | |
|---|---|---|
| १) या जीवनाच्या प्रवासात | सागर भारमल | बी.ए. -१ |
| २) जन्माला आलेला दरोडेखोर | आर. बी. कुरळे | बी.ए. -३ |
| ३) स्त्रियांवरील अत्याचार एक राष्ट्रीय समस्या | कु. आक्काताई पाटील | बी.ए. -३ |
| ४) इथे मराठीचे नगरी 'ज्ञानदेवी' | लक्ष्मण पाटील | बी.ए. -३ |
| ५) कशासाठी? | पी. जी. आरडे | बी.ए. -१ |
| ६) बदलती परिस्थिती आणि युवक | पी. एम्. पाटील | बी.ए. -२ |
| ७) सर्पविश्व | अतुल देसाई | बी.एस्सी. -३ |
| ८) आणि लोकशाहीचा ऱ्हास झाला | संजय कांबळे | बी.ए. -२ |
| ९) प्रेम | सुभाष सुर्यवंशी | बी.ए. -१ |
| १०) कणखर नेतृत्व हवे! | राजमहमद देसाई | बी.एस्सी. -१ |

☆ ☆ ☆

## तुम्हीच आहात तुमच्या जीवनाचे शिल्पकार

तुम्हीच आहात तुमच्या जीवनाचे शिल्पकार,
करु नका विचार फार, सज्ज व्हा, अन्,
''होशियार''.
एक पाऊल पुढे टाका, मागे कधी बघू नका,
एकच विचार करा पक्का,
ज्ञान हा माणसाचा डोळा तिसरा.
जबाबदारीचा शिरपेच घालूनी,
ज्ञान खड्ग ते हाती घेऊनी,
करा तुम्ही दुःख-स्वप्नावर वार,
तुम्हीच तुमच्या जीवनाचे शिल्पकार.
निश्चय एक मनी ठेवूनी, सद्गुणांना धारण
करुनी,
दुर्गुणांना दूर सारुनी,
करा तुम्ही अंधश्रद्धेवरती वार,
तुम्हीच तुमच्या जीवनाचे शिल्पकार.
तुफानांना व्हा सामोरे,
खाच खळग्यांना पार करा,
दृढतेने तुम्ही करा प्रतिज्ञा,
जागृत ठेवू प्रतिभा प्रज्ञा,
भारत मातेची पाळा आज्ञा,
करा शुभचिंतन वारंवार,
तुम्हीच तुमच्या जीवनाचे शिल्पकार.
जीवन आहे जगण्यासाठी,
हसण्यासाठी, खेळण्यासाठी,
भारत मातेच्या पुर्ततेसाठी,
त्यागा, अशुद्ध अंधःकार,
तुम्हीच आहात तुमच्या जीवनाचे शिल्पकार.

संदीप इश्वर गुरव
बी. ए. भाग १

## ती....

कॉलेजची माझी ती
पहिलीच भेट होती
पहिल्यांदाच भेटणारी ती
अगदीच ग्रेट होती,
स्वप्नातही तिलाच
गाठण्याची ओढ होती
रोज जाता येता तिची
माझी भेट होत होती
रोजच ती मनात भरत होती
चुकून आली उशीरा
तर वाटत होती भीती
मित्रांनो, ती आपली
'महामंडळाची बस' होती.

इंद्रजित डी. पाटील
बी. एस्. सी भाग १

## सद्गुण

साधे जिवन चांगले विचार
बनेल आपले मन उधार,
गरीब-श्रीमंतीचा भेद दूर करा.
दीन-दुबळ्यांना जवळ करा.
मातृभूमीचा उद्धार करा.
सेवा हे व्रत, धर्म हा सत्य,
कर्तव्य कर्म आपले ध्येय
स्वर्ग संसाराचा होईल उदय.

जितेंद्र डवर
बी. ए. भाग २

## काही शब्द

काही शब्द असे असतात काळजात उगाच रुतून जातात

लाव्हारसाचे रुप घेऊन मेणासारखे थिजून जातात.

काही स्वप्ने अशी असतात उगाच जीव मारुन जातात.

डुबणाऱ्या नौकेलाही किनाऱ्यानजिक तारुन जातात.

काही सूर असे असतात, उगाच रुंजी घालून जातात.

आकाश निरभ्र असूनही कुठेतरी बरसून जातात.

काही व्यक्ती अशा असतात उगाचच जीवनात येऊन जातात.

काळजाला वणवा लावून उंबरफुलाचे रुप घेतात.

रेहाना जमादार
टी. वाय. बी एस. सी. (फिजिक्स)

## फाशी

दगडाच्या दुनयेत
जन्मु नये फुलाने,
मोठ्यांच्या प्रेमात
पडू नये गरीबाने

हसणाऱ्या चेहऱ्यावर
प्रेम करू नये ज़िवाने,
प्रमोच्या ज्योतीवर
फुंकर मारू नये निर्दयाने,

स्वप्नांच्या जगात
जन्मु नये माणसाने,
दुसऱ्यांच्या भावनांना
दुःखवु नये शब्दाने

पण या जगाची रीतच अशी,
खोट्यांच्या जगात बघ्यालाच फारशी

रणजीत देसाई
बी. एस्. सी. भाग ३

## जीवन

गरीब मनुष्य म्हणतो,
जीवन म्हणजे पैसा
श्रीमंत मनुष्य म्हणतो,
जीवन म्हणजे मज्जाच मज्जा-
कवी म्हणतो
जीव़न हे सूखानी बहरलेले आहे.
पण विद्वान मात्र म्हणतात,
प्रयत्नाविणा जीवन नाही

विनायक पाटील
बी. ए. भाग १

## 'गुरुत्वाकर्षण'

एकदा काय झाले
शास्त्राच्या तासाला
शेवटच्या बाकावरचा
रवि पेंगू लागला होता
डुलता डुलता नंतर बघा
तोल त्याचा गेला
झटकन उठून म्हणतो कसा
गुरुत्वाकर्षणाच्या नियमाचा
पडताळा मी पाहिला

कविता ना. सातुसे
बी. ए. भाग १

## घागर में सागर

जीवनाच्या रिकाम्या पेल्यात,
प्रेमाचे पाणी घालून,
मायेचा लिंबू पिळून,
त्यात दयेचे वेलदोडे टाका.
नंतर उत्साहाची केशर घाला.
आनंदाचा रंग घालून,
स्नेहांचे मीठ टाका
व ते संवेदनांच्या चमच्याने ढवळा
हे शुद्ध सरबतश्रमांच्या चाळणीतून गाळून,
लोभ, मत्सर, राग, निराशा, दुःख, द्वेष व निष्ठूरता
यांची कसर काढून टाका. मग त्या सरबताचा पेला असाचं ऱ्हदयाशी धरा.
कशासाठी ?
पारंपारिक प्रेमांच्या व विश्वबंधुत्वाच्या सफलतेसाठी

नामदेव लोंढे
बी. ए. भाग १

## दिवाना

नजरा नजर आमुची झाली,
आणि वाटले मने मिळाली,
व्यक्त करावी प्रीत कुणी,
संभ्रम दोघांच्याही मनी,
याच संभ्रमी वर्षे गेली,
प्रीत व्यक्त ना परी झाली
वाट पाहून पाहून थकलो
तिची वाट पाहून पाहून थकलो

संजय पाटील
बी. ए. भाग २

## निरोप

आलो आपण दुरुन
विसावलो सावली पाहून
दुधसाखर मायेच्या प्रेमानं
गेलो पुरता न्हाऊन

येथील प्राध्यापक फार गुणी
झालो ज्ञानाचे आपण धनी
वाढवलो आम्हा मायेनं त्यानी
आठवण ठेवा त्यांची क्षणोक्षणी

जरी चुका घडल्या हातून
तरी आम्हा कुरवाळलं मायेनं
त्यांच्या या अतुट प्रेमानं
झालं ओलं चिंब मन

तीन वर्षे काढली आनंदानं
आता दुरावतील मित्रमैत्रिणं
जावू नका विसरुन
जाण ठेवा याची मनी

कसा विसरू या परिसरा
ज्यानं दिला मायेचा निवारा
ज्यानं दाखविला ज्ञानाचा किनारा
ज्यानं फुलवला जीवन फुलोरा

गेली तीन वर्षे सरोनी
सदा आनंदलो मनोमनी
निरोप घेता उर येतो भरुनी
आनंदाश्रू दाटून येतात नयनी

पी. आर. दळवी
तृतीय वर्ष विज्ञान

## सजनी !

सांगायचे होते तुला जे,
अपूरेच राहिले.
वाहिले आहे तूलाच
प्रितीचे फूल पहिले.
सजनी तुझ्याविणा,
जीवनात काय आहे ?
माझ्या हृदयमंदिरात सदा
तुझाच वास आहे.
येशील तू कधी,
जीवन हे अधूरे
कदाचित जे पाहिले मी
स्वप्न राहणार नाहीना अपूरे ?
तुझ्या आठवणीने सजनी
तीव झालाय ग व्याकूळ
रिहाच्या या घडीत हृदयाला
अनंत टोचताहेत शुल.

पाटील एस. व्ही.
प्रथम वर्ष विज्ञान

## पावसाची सर

दूरुन ती दिसत होती
ओळखीची ती वाटत नव्हती
दिसाय फार सुंदर होती
प्रत्येकाला हवी वाटत होती
तिच्या सौंदर्याला सिमाच नव्हती
मी मागे वळुन पहातच होतो
ती माझा पाठलाग करतच होती
मला गाठणार हे माहितच होते
तरी सुद्धा मी पळतच होतो
तिला मात्र मला गाठायच होतं
मी विचारल आपण कोण ?
माझी ओळख अजुन पटलीच नव्हती
लहानपणापासुन म्हाताऱ्यापर्यंत पाहिली
असणारी आणि प्रत्येकाला खालुन दिसणारी
ती आहे पावसाची सर

फराकटे अजित
बी. ए. भाग - १

## पांथस्थ

झालंच तर . . . . . विचार
खुशाल विचार तुझ्या दिवसांना
माझ्या स्नेहांकित नजरेचे,
भावस्पर्शी संदर्भ . . . . . . .
उमगलो जाईन मी, अंर्तबाह्य
तुझ्या अंतरंगातील
प्रितार्थ भावनेला . . . .
तुझ्याचं वाटेवरचा
एक पांथस्थ म्हणून

सागर पाटील
बी. ए. भाग २

## आजचा साधू

प्रभाते मनी पैसा चिंतीत जावा,
सदा सर्वदा भक्तीस वंचित रहावा ॥
नको वासना तुला या भगवंताची,
मनी आस धरावी सदा परधनाची ॥
न राहो सत्व ना राहो स्वत्व,
हेच आहे आजच्या साधूंचे तत्व ॥
मिळे ज्यास धन तोच असे समर्थ,
इतरांचा जन्म असे नुसताच व्यर्थ ॥

चव्हाण सागर शंकर
बी. ए. भाग १

## बाजार

त्या कोवळ्या फुलांचा बाजार पाहिला मी
पैशात भावनेचा व्यापार पाहिला मी
अंधार वेदनांनी आक्रंदतो तरीही
नजरेत वासनेचा शृंगार पाहिला मी
बाहेर सभ्यतेचे गातात गोडवे ते
वेश्यागृहात त्यांचा दरबार पाहिला मी
रस्ते उन्हात न्हाले सगळीकडे परंतू
वस्तीतुनी दिव्यांचा अंधार पाहिला मी
थोडा उजेड ज्याला मागावयाच गेलो,
तो सुर्यही जरासा लाचार पाहिला मी
पोटामधील खळगी भरण्यास रोज येथे
प्रत्येक माणसाला बेजार पाहिला मी

कु. मंगल मांडवकर
बी. ए. भाग १

## अजून वाटते

किती वाटा कुठले गाव
नाव तरी सांगु कोणते
भाव कसला दावू डोळा
जडले म्हणू कोणते नाते ?
तुटले शब्द हुकल्या आशा
संकेताची चुकली रीत
अशी कशी बघता बघता
फुलल्यावाचून सुकली प्रीत !
अजून वाटते-देसभर जरी
मुहूर्त झुकता मागेपुढे
आकाशपाताळ एक करुन
धावलो असतो-तुझ्याचकडे !

सर्जेराव यादव
बी. ए. भाग १

## तुमच्या आशीर्वादानं . . . .

घर झोपडपट्टी भागात हाय
पावसाळ्यात पाणी येतय
हिवाळ्यात वारं घुसतय
उन्हाळ्यात गरम हुतय
पर घर स्वतःच हायं.
सायब तुमच्या आशीर्वादानं
आपुन एकदम मजेत हाय.
इजचा काय प्रश्न नाय
जवळच इजचा डांब हाय
पाण्याला पण काय तोटा नाय
दारात नळ फुटलेला हाय
सायब तुमच्या आशीर्वादानं
आपुन एकदम मजेत हाय.
निराधार म्हणून परकरण केलं
त्यातच पोरीचं लगीन उरकलं
जावई कोर्टात शिपाई हाय
रोजच्याला दहा-पाचला मराण नाय
सायब तुमच्या आशीर्वादानं
आपुन एकदम मजेत हाय
कपड्याल त्याला काय तोटा नाय
नुकतीच 'विधानसभा' निवडणूक झालीय
तवर लोकसभा पुढं हाय
सायब तुमच्या आशीर्वादानं
आपुन एकदम मजेत हाय

संतोष मोरबाळे
बी. ए. भाग १

## निरोप

पतंगा रे पतंगा
थोडासा थांब
आई माझी देवाघरी
निरोप तिला सांग
तुझ्या विना घर
कसे सुने सुने वाटे
फोटोकडे पाहुन तुझ्या
रडू मला दाटे
कुशीत घेऊन माझा
पापा कोण घेइल ?
अश्रू पुसुन मला
खाऊ कोण देइल ?
तुझ्या विना आई
मी राहु तरी कसा
तळमळे जीव जाणू
पाण्यातला मासा
उद्या माझा वाढ दिवस
साजरा कोण करील
मुखी अमृताचे घास
सांग कोण भरील ?
मला विद्यां मिळाली
पण आईचे प्रेम
नाही मिळाले
मला ज्ञान विद्या मिळाली
नाही मिळाली आईची माया
माझ्या साठी कोणीच
मला दाखवली नाही दया
आई माझी तुझ्या घरी
ये तिला निरोप धाडून
उशी झाली ओली चिंब
रात्रभर रडून रडून

श्री. गजानन वापूसो कदम
टी. वाय. बी. एस्. सी.

## स्मृती तरंगिणी

तुझ्या गोडशा मधुर स्मृतीनें,
मन माझे बावरते ॥
बालपणीचा सुगंध सरता,
यौवनातल्या स्मृती न उरता।
तुझ्या चिंतनी मन मोहरता,
तनु माझी थरथरते ॥ १ ॥
तुझ्या संगती दुःख निमाले
प्रीत-पुष्प मम तिथेच फुललें।
चराचरांतील गूढ उकललें,
त्या स्मृतीत मीच हरवतो ॥
आठवतो मग तोच तोच क्षण,
मोहतरें अन् काया कणकण।
सुसह्य होतें जीवन वळवळ,
मधु-घाटात मी त्या तरंगतो ॥ ३ ॥
तुझ्या गोडशा मधुर स्मृतीने,
मन माझे बावरते,

अशोक कदम
एस. वाय. बी. ए



## प्रेम

मागून पहाता
चोरुन पहाता
मिळत नाही ....... प्रेम
दान देता
घडविले जाता
मिळत नाही ..... प्रेम
भीक मागता
श्रीमंती दाखवता
मिळत नाही ..... प्रेम
घडता - घडता
घडत जाते
होता - होता
होत जाते ..... प्रेम

अंजना वा. राजमाने
बी. ए. भाग २

## "चेहरा"

मी एक चेहरा पाहिला आहे, सुंदर चेहरा पाहिला आहे.

तो तितका सुंदर आहे, तितकाच चित्ताकर्षक आहे.

तो इतका आनंदी आणि तेजस्वी आहे की,
संपूर्ण काळोखात सुद्धा त्याची प्रभा फाकते
तो चेहरा स्वतःच आनंदरुप आहे.
तो माझ्या दृष्टीस पडला हे माझे भाग्य होय.
पण हा माझा आनंद इतरांना मिळणार नाही,
कारण हा चेहरा ज्या स्त्रिचा आहे,
ती माझी आई आहे.

व्ही. एम्. पाटील
बी. ए. भाग १

## हे ठरवायचं असतं !

जीवनात काही केलं नाही तरी मृत्यू येतो।
अन् काहिही केलं तरी मृत्यू येतो.
म्हणून काय करावं अन् काय करु नये ?
हे ठरवायचं असतं मृत्यू येण्याआधी ॥

उपदेश करणे सोपे, चुका इतरांच्या दाखविणे सोपे
मात्र स्वतःतसे वागणे आहे कठिणच
म्हणून काय बोलावे अन् काय बोलू नये ?
हे ठरवायचं असते शब्द बोलण्याआधी ॥

समाजासाठी जे जगतात, समर्पित भावनेने कर्तव्या करतात
आणि राष्ट्रसाठी जे, धारा तिर्थी पडतात.
त्यांचा मृत्यू म्हणजे अमर कीर्ती ॥
म्हणून म्हणतो काय करावं। अन् काय करु नये
हे ठरवायचं असतं मृत्यू येण्याआधी, मृत्यू येण्या आधी ॥

चिंदगे पांडूरंग गणपती
बी. ए. भाग ३

## "या संसारी . . . . . !"

दृश्य 'मनोहर' आज जरी,
क्षणात होईल काही तरी
या संसारी . . . . .
अफाट ऐश्वा संसारी,
मानवतेचे विश्व मिळे
या संसारी . . . . . . .
क्षणात येती क्षणात जाती
दुःख सुखाचे ऊन नवे,
या संसारी . . . . .
क्षणात जुळती, क्षणात तुटती,
जीवनातील हे भाव खुळे
या संसारी . . . . .
क्षणात हसती, क्षणात रडती,
माया जाळी स्वप्न खुले,
या स्वप्नांना विसरूनी जाई,
तोच इथे धन्य होई.
या संसारी . . . . . !

कु. सुजाता माने
बी. ए. भाग २

## प्रेमासाठी वाटेल ते

पर्वतावर प्रेम करताना ।
दऱ्यांचा विचार करु नकोस ॥
चंद्रावर प्रेम करताना ।
चांदण्यांचा विचार करु नकोस ॥
सागरावर प्रेम करताना ।
वादळांचा विचार करु नकोस ॥
जीवनावर प्रेम करताना ।
मरणाचा विचार करु नकोस ॥
गुलाबावर प्रेम करताना ।
काट्यांचा विचार करु नकोस ॥
मजवर प्रेम करताना
जगाचा विचार करु नकोस ॥

मांडवकर नामदेव बापूसो
बी. ए. भाग १

## आई

खो-खो हसू नको,
धुडू- धुडू पळू नको,
उठताना, बसताना सावरून बस,
पण, पोरी मनातच हास.
नजरेला नजर लावू नको,
वर मान करून चालू नको,
डोईवरचा पदर पाडू नको,
कोणाशी काही बोलू नको.
हे, सांगते तुला मी पुन्हा-पुन्हा,
कारण, तुझी आई होऊन मी केलाय गुन्हा.

कु. द्रौपदी विष्णू कलिंद्रे
बी. ए. भाग ३

## होय आम्हाला शेषण हवाय . .

होय आम्हाला शेषण हवाय . . .
एक कोटीचा लाच घेणारा
नरसिंहराव नकोय
मंडळ आयोगाखाली मते मागणारा
व्ही. पी. सिंग नकोय .
धर्माच्या नावावर राजकारण करणारा
अडवाणी नकोय
हरिजन, आदिवासींना चिथवणारा
कांशीराम नकोय
हिंदु मुस्लीम दंगे घडवणारा
ठाकरे नकोय
खरोखरच भ्रष्टाचार नष्ट करणारा
शेषण हवाय
होय आम्हाला शेषण हवाय . . . .

पाटील समीर संभाजी
बी. ए. भाग १



## सांगाल का बाई

का मला नापास केले
सांगाल का बाई
मी पेपर लिहीताना
झाली थोडी घाई
दिवाळीच्या सुट्टीसाठी
मी आतुरले होते
पास तुम्ही करणार
माहित मला होते.
घरी होते बोलले मी,
काढीन नंबर,
पैज लावा हवी तर,
रुपये शंभर,
तीन चोक तेरा,
असे लिहीले उत्तर,
सगळेच गुण मला,
मिळाले सत्तर,
जरा माझ्या रुपाकडं,
बहायचे होते थोडे
साऱ्या जणी पेक्षा मी,
खूप सुंदर होते
सांगाल का बाई,
मला नापास का केले ?

संदीप आ. कदम
बी. ए. भाग २

## मॅडम

मनात माझ्या जन्मापासूनी, किती आहेत आशा

मॅडम तुमच्या शब्दांनी त्यांना, दिल्यात नव्या दिशा

फक्त पुस्तकी नाही, शिकविले तुम्ही जीवनाचे ज्ञान

आईप्रमाणे शिकवण दिलीत, देईन मी आईचे स्थान

तुमच्यामुळे जीवनाचा अर्थ आम्हा कळला.

जीवनाचा रस्ता आमच्या, तुम्ही न्यायाकडे वळवला

पुरत नाही देऊन कुणी-कुणा धन

मोठे लागते ते फक्त माणसाचे मन

तुमच्या मनाला देईना मी उपमा आकाशाची

शिकवण आम्हाला दिली त्याने जीवनमार्गाची

आपल्यामुळे कळले आम्हा काय असते जीवन

स्मरणात राहील मॅडम तुमची जन्मोजन्मी आठवण

स्मरणात राहील मॅडम तुमची जन्मोजन्मी आठवण

कु. गोकूळा लक्ष्मण चौगले

बी. ए. भाग २

## प्रेमजीवन

प्रेम करायचे असलीस तर
प्रेम कर पण
तोडू नकोस
नाजूक मनाचे धागे विणणार असलीस तर
धागे विण पण
तोडू नकोस
फुलातील गंध असाच राखणार असलीस तर
गंध राख पण
सोडू नकोस
हृदयांमध्ये आढवणी अशाच ठेवणार असलीस तर
आठवणी ठेव पण
विसरू नकोस
या प्रेमजीवनाला साथ देणार असलीस तर
साथ दे पण
तोडू नकोस
या प्रेमजीवनाला साथ देणार असलीस तर
साथ दे पण
तोडू नकोस

सुरेश लोंढे

बी. ए. भाग ३

## सरिता

मी आकाश बनुनी आलो तेंव्हा
तू म्हणालीस
तू कुठे अन् मी कुठे
तुझ्या माझ्यातील अंतर होय
आपल्या प्रेमाचे काटे
मी प्रकाश बनुनी आलो तेंव्हा
तू म्हणालीस
तू कुठे अन् मी कुठे
अंधाऱ्या रात्री तुला शोधायचे कुठे
मी सागर बनुनी आलो तेंव्हा
मात्र तू
खळखळून हसलीस
अन् माझ्या कवेत विलीन झालीस

**दामोदर कांवळे**

बी. ए. भाग ३

## लाख चुका करीन

लाख चुका करीन
पुन्हा असा चुकणार नाही
चाळणीत पाणी घेऊन जीव देईन
प्रेमात कधी पडणार नाही.
दोन दोन रुपये देण्याखातर
पुन्हा कधी मोजणार नाही.
बाल्कनीची गुलाबी तिकिटे
पुन्हा कधी काढणार नाही.
हसलीस तरी दात वेगांडून
मी कधी हसणार नाही
रुसतो म्हणून रुसवा काढशील,
प्रयत्नाला तुझ्या फसणार नाही.
चाळणीत पाणी घेऊन जीव देईन
पण प्रेमात कधी पडणार नाही

**संदीप पाटील**

बी. ए. भाग २

## किमया श्रावणाची

आले आले दिवस श्रावणाचे । ओले उन पावसाचे ॥

मस्त हिरव्या झालरिचे । दृष्य रम्य ते निसर्गाचे ॥

हिरवा शालू नेसली धरती
मधुनच सरी ये जा करती
चंद्राची हो दृष्ट लागली
मग हळूच काही लाजून म्हणती

हे देय आहे कुणाचे । भोळ्या भाबड्या वरुण राजाचे ॥

सगळीकडे हिरवळ दाटली
मनाला एक आशा वाटली
मनाला एक खून पटली
वर्षभराची पोटगी साठली

असंख्य हो शेतकऱ्यांचे । हरपले भात मनाचे ॥

आले आले दिवस श्रावणाचे । ओले उन पावसाचे ॥

मस्त हिरव्या झालरीचे । दृष्य रम्य ते निसर्गाचे ॥

**श्रीधर जोईल**

बी. ए. भाग २

## कटाक्ष

किती बघशील मजकडे !
जरा पुढे बघ फळ्याकडे,
मित्र माझा बघतो आहे,
तुझ्याकडे अन् माझ्याकडे

लक्ष तुझे नाही इकडे
किती टाकशील कटाक्ष मजकडे
मित्र मला विचारतो आहे.
'' का पहाते ती तुझ्याकडे

काय सांगू मी त्याला वेडे
का सांगू आपल्या प्रेमाचे धडे,
पणं तो मला छळतो आहे
''सांगना का पहाते ती तुझ्याकडे ?

काय सांगू मी त्याला वेडे
का सांगू आपल्या प्रेमाचे धडे,
पण ती मला छळतो आहे
''सांगना का पहाते ती तुझ्याकडे ?''

लक्ष तुझे माझ्या प्रेमपत्राकडे
मन तुझे झाले आहे वेडे
हे मला कळते आहे
किती कटाक्ष टाकशील मजकडे

शिवाजी बोटे
बी. एस्. सी. भाग ३

## वारा, पाऊस

कॉलेजमधून बाहेर पडले
तेव्हापासून
पाठलाग चालवलाय मेल्यानी
माणसे पाहून
बस स्टॉपवर थांबले
तेथूनही हटेना
कांही केल्यानी
त्याला विरोध तरी कसा करणार
ते दोघे अन् मी एकटी
काय बाई बावळटाच धाडस तरी
ओढणी ओढून केसही विस्कटी
क्षणातच केले मला
त्यांनी ओले चिंब
वाऱ्याबरोबर पाऊस होता
झाले होते दोघे धुंद

कु. अश्विनी माजगाव
बी. ए. भाग



## रिझर्व्हेशन

एस टी सुरु होते तेव्हा
मैत्री असते मित्रांसी
तुझा थांबा येतो तेव्हा
चाळा करतो पुस्तकांशी

वह्या पुस्तके टाकुनी
जागा मी रिझर्व्ह करतो
विचारलं तर कुणी
मित्राच नांव सांगतो

दिसता तुझा चेहरा
वह्या पुस्तके उचलतो
पाहुन चेहरा हसरा
का ? हसतेस विचारतो

तुझ्या डोळ्यांचा कटाक्ष
प्यावा असा वाटतोय
खांद्यावर टाकलेला हात
तसाच रहावा असा वाटतोय.

असाच खड्या डबऱ्यांचा
रस्ता खराब असावा
खड्ड्याला चाकाचा
माझा तुला धक्का बसावा

वळणावर गाडी येते तेव्हा
तुझे शरीर मला ओढते
सरळ मार्ग लागतो तेव्हा
भावनांनीच अंग ताळू लागते.

अजय देसाई
बी. ए. भाग ३

## फुलराणी

फुलराणी तु फुलराणी
कशी पाहत आहेस डोकावूनी
हळूच बघते खुद्कन हसते
मलाच तुझी लाज वाटते

रुसु नको तु पुसू नको
लाजेला तु भिवू नको
कोणीतरी आहे तुझा
याबद्दल शंका नको

पाऊस येतो झरझर
कळीचा राग काढतो भरभर
हळूच वारा येऊन जातो.
कळीचे चुंबन घेऊन म्हणतो.

'शंभरात आहे कोणीतरी
हळूच पाहतो डोकाऊन रवी
कळी आईच्या खुशीतुन उठते
लग्नासाठी तयार होते.

कळीची तु झालीस राणी
रवीचा तु झालास राजा
नलदमयंतीसारखा जोडा
कसा दिसतो भोळा भाबडा

पाटील कृष्णा शंकर
बी. ए. भाग २

## 'निरोप'

अखेरचा मी निरोप देतो
पुन्हा कधीही भेटू नको
जुन्या जखमाचे जुणे व्रण हे
पुन्हा पुन्हा तु पाहू नको
अखेरचा मी निरोप देतो ॥

माझी चिंता तु करु नको
पूर्व जन्माचे दुःख भोगतो
पण तु दुःखी होवू नको
अखेरचा मी निरोप देतो ॥

वचन कधीही आठवू नको
झाले गेले होवून गेले
उगीच खंत तू करु नको
अखेरचा मी निरोप देतो ॥

मागे वळून पाहू नको
दुःखाने मी निरोप देतो
पण तू दुःखी होवू नको
अखेरचा मी निरोप देतो
पुन्हा कधीही भेटू नको ॥

**राजन परुळेकर**
बी. एस. सी. भाग ३

---

## आई एक महान दैवत

'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी'

'आई' या दोन अक्षरांत एवढी माया भरलेल आहे की कुणाही माणसाला त्यापुढे सर्व का तुच्छ वाटते. म्हणून तर मोठमोठी माणसे सांगतात की धन, मान, प्रतिष्ठा सर्व गोष्ट आईपुढे क्षुल्लक आहेत. ज्याच्याजवळ स प्रकारचे वैभव आहे असा धनवानही आ नसल्यास भिकारी आहे.

आईची थोरवी सर्वांनीच गायीली आहे. पुराणातही आपल्याला श्रीगणेश भेटतो, की ज साऱ्या विश्वाला एका पारड्यात घालतो आणि मातेला दुसऱ्या पारड्यात. तरीही मातेचे पारडे ह जडच राहते. इतिहास काय सांगतो ? शिवाजी महाराजांना जिजामाता ह्या सर्वस्व होत्या. जिजामातेचे आपल्या मस्तकावर पडलेले आनंदाश्रू हाच राज्याभिषेक, असे ते मानत होते. श्री. रामकृष्ण परमहंस यांना आपले सर्व मोठेपण सापडते ते आईच्या ठिकाणीच. आई आपल्या बाळासाठी काय करत नाही ? बाळ जेव्हा चालू, बोलू शकत नसते, तेव्हा आई त्याची सर्व काळजी घेते. त्याला काऊचिऊच्या गोष्टी सांगून खाऊ घालते. बोट धरून चालायला शिकवते. आपल्या बाळाला ती लिहायला, वाचायला शिकवते. आपल्या बाळाला मोठा करण्यासाठी ती वाटेल तेवढे कष्ट करते आणि ते सुद्धा वृत्तीने. म्हणून कवी मोरोपंत म्हणतात,

'' म्हणूनि म्हणति भले 'न ऋण जन्मदेचे फिटे.''

**संतोष ढवण**
बी. ए. भाग २

# या जीवनाच्या प्रवासात

सागर भारमल
बी.ए. भाग १

मित्रानो,

या जीवंनाच्या प्रवासात प्रत्येक क्षण मागे टाकत आपण पुढे पुढे जात असतो. पुढे एखादा क्षण हातातून निसटला की ती वेळ हुकली की हुकली. पुन्हा परत ते क्षण येणे अशक्य असत. असच माणसाचे कालचक्राच्या भोवऱ्यात फिरता फिरता कुणीतरी वाटेत भेटते ओळखीच होत. जवळच् होउन जाते पण या ओधात हातात आलेला हात हळू हळू निसटत जातो. आणि पुन्हा माणूस एकाकी होतो. गेलेले प्रत्येक क्षण परत येणे शक्यच नसतं. मग हाताश पणे आठवणींचा खजीना उधळण्या पलीकडे हातात काय राहतं ? फक्त निराशाच.

जीवन म्हणजे न संपणारा रस्ता. वाटेत माणसांच आयुष्य संपत. उरलेल्या साठी हा लांबरुंद रस्ता वाहतच असतो. वाहत्या वाटेवर भेटलेली माणसं मोहाची ठिकाणं सगळ जात्या क्षणाबरोबर मागे जातं. पुढे जातो फक्त आपण, एकटेच.

काळाच्या अधांरात गडप झालेले क्षण पुन्हा ओजंळीत घेता येत नाहीत. सकाळ होते, फुले उमलतात, बागा फुलतात हा तर सृष्टीचा नियम. रोजच्या वाटेवर रोजचीच माणस भेटतात. पण जी फुल वास्तवाच्या धगीनं, शिखराच्या तडाख्यानं कोमेजतात, ती बहारांच्या कितीतरी लाटा आल्या तरी फुलत नाहीत. काही माणसं आपल्या आयुष्यातून निघून जातात, त्यांची उणीव हजारो माणसांच्या येण्यानही भरुन निघत नाही अशी माणसं जातानाच्या वेळीच त्याना परतण्यासाठी सांगाव लागत. नाहीतर आयुष्यभर तुम्ही त्याच्या नावाचा जप केलात तरी ते परत्त नाहीत. ते क्षण, ती माणसं परत येत नाहीत.

या जीवनाच्या वाटेवर माणसं दुरावतात ती कशामुळं ? तर गैरसमज, संशय यामुळेच. संशय मनात शिरला की सगळी नाती खोटी वाटू लागतात. मैत्री, प्रेम सगळयाची व्याख्या बदलून जाते. म्हणूनच आपण संशयाला जराही जागा देऊ नका. ज्या आठवणी उद्या तुमचं जगण असहय करतील अशा जिवाभावाच्या माणसांना वेळीच थांबवा. ती वेळ, क्षण निघून गेली की काहीच उपयोग नसतो. नंतर प्रेमाचे हजारो संदेश पाठवले तरी ते निघूने येत नाहीत.

या जीवनाच्या वाटेवर, सकाळ होते, रात्र आपला पसारा आवरुन निघून जाते, दिवस, निघून जातात. काळ कुणासाठी थांबत नाही. क्षण मागे पडत जातात. माणूस मनाने त्या दिवसांमध्ये गुंतलेला असतो. त्यातून बाहेर पडायचा असतो तोवर ते सोनेरी दिवस संपून जातात.

# जन्माला आलेला दरोडेखोर

कुरळे आर. बी
बी. ए. भाग ३

रामपूर गावामध्ये एक गरीब पण शिकलेला असा एक तरुण राहत असतो. तो साधा, भोळा असतो त्या तरुणाचे नाव दगडू असते. त्याला त्याची फक्त आई असते. दगडू लहान असतानांच त्यांचे वडील गेलेले असतात. म्हणजेच त्यांच्या वडीलाना एकाआजाराने झोडपून नेलेले असते अशी ही दोघे त्या गावामध्ये राहत असतात.

गावा मध्ये एक पाटील राहत असतो त्या पाटलाची मर्जी सर्व गावावर असते. त्याचा दरारा सर्व गावावर असतो. कुणीही त्यांच्या उलट जावू शकत नव्हते का कुणी त्यांच्या उलट गेले तर त्यांचा हिसका सर्वांना माहीत असे, 'कि तो जाऊन त्याला आपल्या वाड्यात आणून खांबाला बांधून चाबकाने मारत असे आणि तसेच गावातील सर्व माणसे त्याच्या ताब्यात होती आणि गावामधील पंचायत पण त्यांच्या ताब्यात असते आणि गावामध्ये एक पोलीस स्टेशन असते ते सर्व पोलीस त्याच्या ताब्यात असतात व गावामध्ये एक डॉक्टर असतो तोपण त्यांच्या ताब्यात असतो.

एके दिवशी दगडूची आई आजाराने घायाळ झालेली असते. दगडू गावामधील डॉक्टरांकडे येतो व त्या डॉक्टरांना सर्व हकीगत सांगतो. डॉक्टर दगडूचे बोलणे ऐकुन घेऊन दगडु च्या घरी जाण्यांस निघतात. तोपर्यत पाटलाचा गडी रानू पळत येवून सांगतो कि, 'डॉक्टर, डॉक्टर पाटलांच्या मुलीचे डोके दुकावयास्त लागले आहे.' आणि तुम्हाला बोलावले आहे डॉक्टर दगडू च्या घरी जाण्यांचे सोडून पाटलाच्या वाड्याकडे येतो. त्यानंतर दगडू पाठोपाठ पाटलांच्या वाड्यावर येतो व पाटलांना सर्व हकीगत सांगतो पण पाटील त्याच्या बोलण्याकडे लक्ष न देता त्याला मार हाण करुन व शिवीगाळ करुन त्यालातेथून घालवण्याचा प्रयत्न करतो पण दगडू जाता जाता, म्हणतो '' पाटील तुमच्या मुलीचे फक्त डोके दुखते आहे.पण माझी आई मरणाच्या घरात उभी आहे '' तरी सुद्धा पाटील व डॉक्टर त्याचे म्हणणे ऐकून घेत नाहीत चिडून दगडू पाटलांच्या अंगावर जाऊन त्याला मारहाण करतो, शिवीगाळ करतो व तेथून घरी येतो.

दगडू ला पोलीस धरुन नेतात. कारण त्याच्या आदल्या दिवशी गावामध्ये पाटलाच्या वाड्यांवर एक दरोडा पडलेला असतो पण तो दरोडा एका झुंझार डाकुने घातलेला असतो दरोडा दगडूनेच घातला असे समजताच पोलीस त्याला तुरुंगात डांबून घालतात मार मार मारताता इकडे त्यांच्या आईला बघणे साठी कोणीही नसते तुरुंगात त्याला आईची आठवण येते पण तो काही करु शकत नव्हता.

आणि त्याच रात्री झुंझार दरोडे खोराला ही बातमी कळते कारण झुझार अन्याया विरुद्ध

लढ त असतो. आणि त्याला दरोडे खोर बनवण्यांस पाटीलच कारणीभूत असतो. म्हणून गावामध्ये आपल्या साथीदारांना घेऊन सरळ पोलीस स्टेशनवर दरोडा घालतो व तेथील सर्व पोलीसांना ठार मारतात दगडूला आपल्या सोबत घेऊन जातात. दगडू ला एका जंगलातल्या गुहेत घेऊन जातात. दगडू आपली सर्व हकिगत त्यांना सांगतो कारण दगडूला माहीत असते की झुंझार हा अन्याया विरुद्ध लढा देणारा असतो. झुझार दगडू चे सर्व बोलणे ऐकून घेऊन त्याला सांगतो की '' जर तुला बदला घ्यावयाचा असल्यास तूला दरोडे खोर बनायला पाहिजे '' त्यावर दगडू म्हणतो '' नाही, नाही मी हे दरोडे खोराचे कृत्य करणार नाही. कारण हे माझ्या आईला कळाले तर माझी आई मरुन जाईल व माझ्या आईला कोणीही पाहणार नाही त्यावर झुंझार म्हणतो की तुझ्या आईला कोणीही सांगणार नाही असे म्हणून एका साध्या भीत्र्या दगडू ला दरोडे खोर बनवतात.

गावामध्ये पाटील व त्यांचे साथीदार दगडूच्या आईचा छळ करत असतात, गावामधल्या सर्व माणसांना पाटील सांगतो कि दगडू ला कोणीही पाऊल ठेवू द्याचा नाही. दगडू च्या आईला पाटलांच्या वाड्यावर आणतात व तिला खांबाला बाधून घालतात ही बातमी लागलीच झुझारला व दगडू ला कळते लागलीच दगडू झुझार व त्यांचे साथीदार रात्रीचे पाटलांच्या वाड्यावर येतात व पाटलाला आपल्या ताब्यात घेतात व सांगतात की, ''पाटील माझ्या आईला जर काय झाले तर मी तुला सोडणार नाही'' आणि जोपर्यंत माझ्या आईची सोडवणूक होत नाही तोपर्यंत तुमची मुलगी आमच्या ताब्यात नेतो. दगडू व झुंझार पाटलांच्या पोरीला वाड्यावरुन घेऊन जातात.

पाटील इकडे अस्वस्थ झालेला असतो. फार चिडलेला असतो व सरळ जाऊन दगडू च्या आईला सांगतो कि तुझा पोरगा दरोडे खोर झालेला आहे त्यावर ती म्हणते नाही, नाही माझा पोरगा दरोडे खोर नाही, दगडू च्या आईला दगडू कडे स्वाधीन करण्यासाठी जंगलातल्या एका झाडापाशी येतात. याकडे दगडू व झुंझार पाटलांच्या मुलीला घेऊन तिथेच येतात, त्यावर पाटील दगडू च्या आईला म्हणतो की तो बघ तुझा मुलगा दरोडे खोर झाला आहे त्यावर ती त्याला म्हणते की, ''नाही, नाही माझा मुलगा हा नव्हे. कारण माझा मुलगा चांगला शिकलेला आहे. त्यावर दगडू तेथे येऊन म्हणतो की नाही आई नाही, मला दगोडे खोर बनवायला पाटीलच कारणीभूत आहे. दगडू आपल्या आईला पहिली सर्व हकीगत सांगतो व आईला म्हणतो की आई हे सुद्धा दरोडे खोर नाहीत कारण मी जसा शिकलेला आहे तशीच ती पण शिकलेली आहेत आई हा झुंझार दरोडे खोर नाही ग कारण या पाटलाने झुंझारच्या बहिणीवर बलात्कार करुन तिला मारुन टाकले व झुंझारवरच नाव घालून त्याला पोलीसांच्या ताब्यात दिले. आई आता तुच सांग गं, दरोडे खोर कोण ? आणि आई आम्हाला सर्वांना दरोडे खोर बनवायला कारणीभूत हा पाटीलच आहे. पाटील फार चिडलेला असतो, पाटील आपल्या बंदुकीची गोळी दगडू वर झाडतो व दगडू खाली कोसळतो, लागलीच झुंझार व त्यांचे साथीदार पाटलाला ठार करतात, लागलीच इकडे गावतील माणसे पोलीसांना घेऊन येतात व पाटलांच्या साथीदारांना ताब्यात देतात व सांगतात की साहेब हे दरोडे खोर नाही दरोडे खोर आहेत ते पाटलांचे साथीदार त्यानी गावातील सर्व माणसांचा छळ केला आहे. व साहेब, हा झुंझार दरोडे खोर नाही त्याला दरोडे खोर बनवला. आहे तो अन्याया विरुद्ध लढत आहे. त्याने आम्हा सर्व गावकऱ्यांना काही केले नाही त्याला तुम्ही सोडून द्या. नंतर दगडू आपल्या आईला शेवटचे सांगतो की, ''नाही आई नाही मी जन्माला आलेला दरोडे खोर नाही'' कारण दरोडे खोर हा पाटील आहे त्याने आम्हा सर्वांना दरोडे खोर बनविले एवढे सांगून दगडू आपला प्राण सोडतो.

# स्त्रियांवरील अत्याचार एक राष्ट्रीय समस्या

कु. पाटील आक्काताई
बी. ए. भाग ३

स्वातंत्र,समता, बंधुत्व या मूल्यांचा जयघोष करणाऱ्या भारतात स्त्रीचे स्थान काय आहे ? हा प्रश्न खरा विचार करण्याजोगा आहे.

आज कोणतेही वर्तमानपत्र उघडा त्यामध्ये तुम्हाला स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराची वा बलात्काराची माहिती वाचावयास मिळेल. अपघाताशिवाय जसादिवस सुना जात नाही, तव्दनाच बलात्काराशिवायही,असा जणू आज संकेतच होऊ पहात आहे.

स्त्रियांवर होणारे अत्याचार ही काही आजची घटना नाही. हे अत्याचार अनादीकालापासून होत आले आहेत अत्याचार म्हणजे केवळ शारीरिक असे म्हणणे पूर्णपणे चुकीचे ठरेल हे अत्याचार शारीरिक मानशीक तसे आर्थिकही आहेत.

आमच्या पुरुषप्रधान समाजरचनेमुळे स्त्रीकडे आलेले दुय्यम प्रकारचे स्थान हेही ह्या समस्येचे बीज ठरु शकेल. कुटुंब प्रमुख पुरुषालाच विविध अधिकार असल्याने स्त्रिला कोणत्याही प्रकारचे अधिकार शिल्लक राहिले नाहीत. कुलप्रमुखाची इतर कुटुंबियावर किती विविध प्रकारची सत्ता चालते ह्याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे महाभारतातील धर्मराज होय स्वतः द्युतात हरल्यानंतर ही द्रोपदी पणाला लावण्याचा त्याला कोणता अधिकार होता. त्याला कोणीही विरोध करु शकले नाही. भीष्म, द्रोण इत्यादी आचार्यही द्रोपदीच्या प्रश्नाला उत्तर देऊ शकलेले नाहीत.

तसेच द्रोपदीची वाटणी पांच पांडवात झाली. द्रोपदीचा एक माणूस, जिवंत मन, एक स्त्री म्हणून विचार केला गेला नाही. मातृभक्ती या नावाखाली एका स्त्रीच्या मनाचा विचार न करता पुरुषाच्या वर्चस्वाने घेतलेला हा एकतर्फी निर्णयच होय. स्त्री ही आपल्या मालकीची एक वस्तू आहे. या प्रवृतीचे येथे दर्शन घडते. तिच्या वस्त्रहरणाचा प्रसंग म्हणजे तर गलिच्छपणाचा कळसच होय.

स्त्रीही घराबाहेर पडल्यामुळे, तिने घराचा उंबरा ओलांडल्यामुळे स्त्रीला या अत्याचारांना बळी पडावे लागेल असा तिच्यावर आरोपही केला जातो पण ही स्त्री घराबाहेर का पडली याचा कोणी खोलवर विचार केलेला आहे का ? स्त्री ही अत्यंत भावनाशील वृत्तीची आहे. ज्यावेळेस पुरुष हे अर्थार्जनात अपुरे पडू लागले यामुळे आर्थिक जीवन जगणे जिकीरीचे झाले त्यावेळेसच हे पैशाचे अपुरेपण भरुन काढण्यासाठी ती बाहेर पडली. तिला माहीत होते संसार हा एक रथ आहे. या रथाची दोन्ही चाके समान असतील तरच हा रथ योग्य रितीने मार्ग आक्रमू शकेल. आपला संसार व्यवस्थित चालविण्यासाठी पतीची अर्थिक ओढाताणव तारांबळ थाबविण्या साठीच तिला घराबाहेर पडाव लागल. यात दोष कोणाचा ? घराबाहेरचा प्रत्येक क्षण ती आज असुरक्षितेतच कंठते आहे. व असुरक्षिततेचा एखादा क्षणही तिचा कायमचा घात करतो.

याचे उत्कृष्ट चित्रण ‘सुशीला’ या

चित्रपटात केलेले आहे . एक चांगली घरंदाज सुसंस्कृत शिक्षिका, जिची ध्येय उच्च असतात, आकांक्षा मोठ्या असतात, भावी पिढीला नविन विचार पुरविण्याचा जिचा कल असतो अशी ही सुशिला हिला शेवटी एक वेश्या बनावं लागत आणि याच् कारण समाज होय. यासारख्या गोष्टीमधूनच वेशाव्यवसाय वाढीस लागला आहे. बलात्कार झालेल्या स्त्रीला समाजात परत कोणतेही स्थान दिले जात नाही. या स्त्रीकडे समाज विकृत दिशेने पाहतो हा पुन्हा तिच्यावर वेगळाच अत्याचार होतो व ही स्त्री जिवंतपणीच मरण भोगत असते.

आपल्या देशात विधवा विवाह कायदा होऊन १०० वर्षे लोटली पण अजूनही आपल्या समाजात विधवा विवाहांना म्हणावी तेव्हढी मान्यता नाही. पहिली पत्नी मृत झाल्यावर तो पती दुसरी, तिसरी, चौथी पत्नी करु शकतो. पण पतीच्या मृत्युनंतर एखादया पुरुषाचा विचारही मनात येणे हे पाप समजले जाते.

स्त्रियांवरील अत्याचाराचा अत्यंत ज्वलंत असा प्रश्न सध्या दिसून येतो तो म्हणजे देवदासींचा हा प्रश्न अत्यंत गंभीर व भयानक आहे. आज दरवर्षी माघ पौर्णिमेला सौंदतीला ५ हजार मुलींना देवदासी बनविले जाते १० व्या, ११ व्या वर्षी या मुली देवीला सोडल्या जातात. यानांही मन आहे, भावना आहे याचा विचार केला जात नाही. ही स्त्री कधीच लग्न करु शकत नाही. परंतु तिच्या आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक पुरुषाचा स्विकार तिला 'परशुरामाचा अवतार' म्हणून करावा लागतो. मग हा पुरुष कोणत्याही व कशाही प्रकारचा असो, महारोगीही असो, त्याच्या स्वाधीन व्हावं लागतं व नंतर समाजामध्येही त्यांना कसलीही प्रतिष्ठा व स्थान रहात नाही.

आजचे चित्रपट, आदर्श वर्तमानपत्रे व मासिके याद्वारा स्त्रीवर एकप्रकारे मानसिक अत्याचार केला जात आहे. वर्तमानपत्रे व मासिके यावरील स्त्रीयांची अर्धनग्न चित्रे, चित्रपटातील बलात्कारदृश्ये यानेही समाजाची सुसंस्कृती निश्चितपणे बिघडलेली आहे. लोकांच्या विचारात जागृती व्हावी, त्यांना जाग यावी. या दृष्टि कोनांतून लोकमान्यांनी केसरी व इतर वर्तमानपत्रे त्या काळात सुरु केली पण आज या वर्तमानपत्राची वा मासिकांची काय स्थिती आहे ? लोकविचारांची जागृती या ठिकाणी पाहिजे.

स्त्री ही केवळ मादी नाही सुदंर अंतरंग लाभलेली ती एक शक्ती आहे. तिला केवळ लोभसवाणं शरीर नाही तर त्या शरीराच्या आत संवेदनाशील मनही आहे. तिच्या ठिकाणी आत्म्याची प्रेरक शक्ती आहे. यासारख्या गोष्टींचे प्रथमपासूनच समाजात भान असणं आवश्यक आहे. तिचे व्यक्तिमत्व फुलू द्या.

शेवटी एवढच सांगावसं वाटत स्वतःचे कुटुंब सावरण्यासाठी बाहेर पडलेल्या स्त्रीला एका प्रकारची नितीतत्वे व पुरुषाला वेगळ्या प्रकारची नितीतत्वे लावून चालणार नाही. आजपर्यंत काय झाल असेल ते होवो पण या पुढच्या काळात हा मानवतेचा दीप स्त्री व पूरुष या दोघांनाही हातात घ्यावयाचा आहे. या पुढील काळात ही नवीन स्त्री पुढे येणार आहे. पुरुषा पेक्षा तिचा झगडा अधिक उज्वल आहे. कारण तो मातृत्वाने व वात्सल्याने भरलेला आहे.

## आधुनिक म्हणी

१. अभ्यासा घटका भर , गप्पा तासभर.
२. भेसळीचे खाणार, त्याला सरकार देणार.
३. अडला विद्यार्थी, कॉपीचे पाय धरी.
४. नोकरी नाही,पण मुलाखती फार
५. मरावे परी रेशनकार्डावरी उरावे.
६. खायला रेशनचा कोंडा, आणि फिरायला हिरो होंडा
७. दिसते चांगली साडीत, पण चालते रस्ता झाडित.

मेघा सीरसाट, बी. ए. भाग १

# इये मराठीचे नगरी 'ज्ञानदेवी'

लक्ष्मण पाटील
बी. ए. भाग ३

श्री ज्ञानेश्वरांची ओळख महाराष्ट्र ातील लोकांना करुन देण्याची जरुरी नाही ती देणे म्हणजे सुर्याची ओळख करुन देण्यासारखे आहे. कुरुक्षेत्रावर भगवान श्रीकृष्णानी अर्जुनाला जी गीता सांरगतली तीच ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथात मांडली आहे.

भगवान श्रीकृष्ण आणि पंढरीचा पांडू रंग हे एकच आहेत 'जेणे गीता उपदेशिली ती ही विटेवरील माऊली' आणि श्री पांडू रंगानीच श्री ज्ञानेश्वर महाराजांचा अवतार घेतला आहे. 'अवतार पांडू रंग नाव ठेविलेज्ञान।' अशा रितीने श्री ज्ञानेश्वर महाराज हे भगवान श्री कृष्णाचाच अवतार ठरतात.

नमो ज्ञानेश्वरा निष्कलंका।
जयाची गितेची वाचिता टीका।
ज्ञान होय लोका।
अतिभाविका ग्रंथार्थिचा॥

श्री ज्ञानदेवांची वा श्री ज्ञानदेवीची महती सांगताना माझ्या सारख्यांनी शब्दांचे कितीही बुडबुडे निर्माण केले तरी ते अपुरेच आहेत श्री ज्ञानेश्वरांच्या वाङमयातुन आपल्याला हे दिसून येते की त्यांनी चार वेद, सर्व सहाशास्त्रे, अठरा पुराणे सर्व दर्शने बौद्ध मत, जैन मत, शिवाय शैवांचे सर्व ग्रंथ अशा कमीत कमी पस्तीस ग्रंथाचा अभ्यास केला होता.

गीता शास्त्र सांगितलेल्याला आज हजारो वर्षे झाली तरीही ते निर्माण झाले ते केवळ अर्जुनाचा नैमितीक भ्रम महिमा नाहीसा करण्यासाठी हे म्हणणे अत्यंत चुकीचे आहे. वस्तुतः जगाचा उद्धार व्हावा या हेतुने अर्जुनाला निमित्य करुन ते तत्वज्ञान प्रकट झालेले आहे. कांही वाङमय प्रती वाचून वाचून शिळ्या झाल्या आहेत पण गेली सातशे वर्षे अनंत लोकांनी ही ताजी असणारी एकच एक अमर ज्ञानदेवी आहे.

आजच्या काळामध्ये ज्ञानदेवीच्या तत्वज्ञानाची फार मोठ्या प्रमाणात गरज आहे माणसाचे ईश्वरावरील प्रेम नाहीसे होत चालले आहे माणूस व्यसनाधीन बनत चालला आहे. म्हणून ज्ञानदेवाच्या तत्वज्ञाना शिवाय पयार्य नाही. आजचा जीव म्हणजे अर्जुनच आहे. कर्म काय, अकर्म काय, या गोंधळा मध्ये आजचे समाज जीवन कर्तव्यमुढ झाले आहे त्या अर्जुना पुढे केवळ अदरा अक्षौहिणी सैन्य होते परंतु आजच्या अर्जुनापुढे तर प्रत्येक क्षणाला युध्दाचा प्रसंग उभा आहे. म्हणूनच श्री तुकाराम महाराज म्हणतात "रात्रं दिवस आम्हा युध्दाचा प्रसंग। अंतर्बाहय जग आणि मन दैवी संगतीचे आसुरी संपत्तीशी जीवाच्या ठिकाणी चाललेले हे युध्द अटळ आहे ते न संपणारे आहे. आज ही आपल्या अंतःकरणात असलेले दुर्योधन, दुःशासन, शकुनी आपल्या वृत्तीवर मात करुन बसलेले आहेत अशा वेळी जीवाजवळ गीतेशिवाय कोणता बरा पर्याय आहे ? म्हणून श्री

ज्ञानदेवानी असे नित्य नूतन गीता तत्वज्ञान केवळ महाराष्ट्राला नव्हे तर साऱ्या जगाला दिलेले आहे. हा महाराष्ट्रातील एकमेव संत म्हणण्यास हरकत नाही 'श्री ज्ञानदेवोच्छिष्ट जगत्रयम' म्हणून आजच्या काळात ही किंबहुना जग असे पर्यंत ही काळाची गरज म्हणून ज्ञानदेवी ही अमर राहणार आहे.

हिंदु तत्वज्ञाना मध्ये सहा आस्तिक दर्शने आणि सहा नास्तिक दर्शने अशी एकूण बारा दर्शने आहेत परंतु श्री ज्ञानदेवांनी चिदविलास वादाचे वेगळे तत्वज्ञान सांगून नवे दर्शनच शास्त्राला दिले आहे. म्हणून श्री ज्ञानदेवांचे हे अव्दैत तत्वज्ञान तेरावे दर्शनच आहे. अशा रितीने भक्त, जग व देव यांचे अव्दैत तत्वज्ञान श्री ज्ञानदेवानी जगाला दिले.कर्नाला भक्ती शिवाय गती नाही आणि ज्ञान हे भक्ती शिवाय महत्व नाही म्हणून शिवशक्ती समावेशक शंभूचा मी शांभवी झालो. असे ते म्हणतात सर्व खल्विंद ब्रम्ह असे एकात्म सांगणाऱ्या श्रुती पासुन 'अणू-रेणू या थोकडा। तुका आकाशा एवढा' असे म्हणणाऱ्या श्री तुकाराम महाराजा पर्यंत ती अद्वैत भक्ती सांगितली आहे ते अद्वैत विचार सुत्र अलौकिक श्री ज्ञानदेवानी प्रथम सांगितले आहे त्याचा विचार वरवर करुन भागणार नाही.

'ॐ नमो' श्रि आद्या या प्रथम ओवीपासुन 'पसायदान' हे तर त्यांच्या तत्वज्ञानाचा कळस आहे. व तेथेही भजिजो आदिपूरुख अशी भक्ती आहेच. पसायदान' हे एका महाकवीचे स्वप्न आहे. एक त्रिकाल ज्ञान्याने पाहिलेला समाज आहे. या समाजात दुष्टांचा दुष्ट स्वभाव जाऊन सर्व समाजात मैत्री शांतता व सुख-मांगल्य यांचाच वर्षाव आहे. गेली सातशे वर्षे महाराष्ट्र भुमंडळी या वर्षावाने भिजत आहे. 'भगवद गीता' ही जशी श्री कृष्णाची वाङमयीन मूर्ती आहे तद्वतच 'ज्ञानेश्वरी' ही संत ज्ञानदेवांची, 'भागवत' संत एकनाथाची, 'गाथा' संत तुकोबारायांची वाङमयीन मूर्ती आहे. या ग्रंथाच्या केवळ पूजनाने दर्शनानेही भाविकांना एक प्रकारची ननःशांती समाधन लाभत असते. ही संत साहित्य संपदा म्हणजे आपल्या संस्कृतीचा एक मौलिक ठेवा आहे.

आपण एकविसाव्या शतकाकडे चाललो आहांत समाजातील समाज जागृती विसरत चालली आहे. राजकारणी भ्रष्टाचाराला प्रथम क्रमांत घेत आहेत सर्वत्र लाचारी वाढली आहे , आई वडीलाना माणूस विसरत चालला आहे, सगळीकडे अराजकता माजली आहे. गुरुजनांचा आदर विसरत जात आहेत. बोलण्याचे भान राहू शकत नाही. तलवार, चाकू व स्टार यांच्या वर्चस्वाखाली सापडली आहे. सर्वत्र औघोगिकरण झालेले आहे . मनोरंजनात्मक साहित्य वाढत चाललेली आहेत. टि.व्ही,टेप-रेडिओ,चित्रपट अशा अनेक माध्यमातून नको त्या कृत्याना वाव मिळत आहे. या अशा कांही गोष्टी मुळे समाजात आराजकता, अशांती, हिंसा, अत्याचार, भ्रष्टाचार वाढीस लागला आहे. लोकसंख्येत भयानक वाढ झालेली आहे. अशा अनेक गोष्टी समाजात घडत आहेत. जुने तत्वज्ञान विसरत चालले आहे. संस्कृती लोप पावत आहे माणूस माणसाला खाऊ लागला आहे. अशा परिस्थितीत संत साहित्याचा आभ्यास केला तर मनाला सुख व शांती मिळेल.

जगातील सर्व विघटनवादी वाईट शक्तीनां समर्थपणे तोंड देण्याचे अलौकिक सामर्थ्य संत साहित्यात आहे. नीती मूल्य झपाट्याने नष्ट होत चाललेल्या आजच्या समाजात नीती मूल्यांची पुर्नस्थापना करुन अवघा समाज एकसंध करण्यासाठी संत साहित्याची फार मोठी गरज आहे.

'शके बाराशे बारोत्तरे।
तै टिका केली ज्ञानश्वरे॥

बाराव्या शतकात ज्ञानदेवानी ज्ञानदेवी ही महाराष्ट्रातच लिहीली. इथे मराठीचिये नगरी ज्ञानदेवी' लिहीली तिचा आदर आज आम्ही अभिमानाने सांगितला पाहिजे हे विसरुन चालणार नाही. शेवटी त्या विश्व माऊलीच्याचरणी एकच प्रार्थना.

आणि ग्रथोपजीविजे। विशेषी लोकी इये।
दृष्टादृष्ट विजये। व्होवावे जी॥

# कशासाठी ?

आवडे पी. जी
बी. ए. भाग १

सूर्य पश्चिमेला मंद गतीनं चालला व्हता. तेची सोनेरी किरन राहून गेल्यानं गुलाबी छटा उमटल्या व्हत्या. गावापासनं एका हाकेच्या अंतरावर असणारा मांगवाडा अंधाराच्या कुशीत सरकत व्हता. चिचेंच्या मागल्या बाजुला शिराट्याच पण मध्येच थोडंस वाकलेल आप्पा मांगाच घर दारिद्रयाच्या खाईत कितीतरी दिवस व्हत. आप्पा मांगाची पोर शिरमी बा ची वाट बघत दाराच्या मेडीला धरुन उभी व्हती. घरात तीन दगडाची चुल थंडगार व्हती बायजाचं बी डोलं धन्याच्या वाट्ला लागलं व्हत.

आप्पा थोड्याश्या आशेनं पाटलाच्या वाडयावर गेला व्हता. तोही उद्याच्या कामाच्या पगाराच्या आशेन. हातात गुंडाळलेली पिसवी घेऊन वाड्याच्या पायरीच्या बाजूला उभा व्हता. पाटील वाड्याबाहेर येताच आप्पानं आपली बाजू सांगितली.

'धनी, मला पैश्याची लई गरज हाय, तेही मला कामाच्या आशेवर द्या'

'आरं, आप्पा तू थोडा येळ केलास, आताच त्या भैरु मांगानं तेला पाहिजे तेवढ पैसं नेलं बघ,

'धनी, मला इतकं नगं थोड दया' आप्पा बोलला . आरं, पर आता कुठलं आनायच, तू चार दिसानं ये. आप्पाच उरलं सुरलं अवसान तिथच संपल त्याच्या मणात विचाराचं थैमान माजलं की पाटलाकडं पैस असून सुदधा पैसं दिल नाय तवा गावात कुनीबी देनार नाय म्हणून कडूंस पडायच्या आत गुंडाळलेली पिसवी घेऊन आप्पा घराच्या वाटंला लागला.

कोणतरी अंधारातून आपल्याकडं येत असेलेल बघून शिरमी बाच्या आशेनं दोन पावलं फुड झाली पर बाच्या हातात गुंडाळलेली पिशवी बघताच शिरमीची दिवसभराची आशा मावाळली.आप्पानं शिरमीला आपल्या पोटाशी धरुन आतन्हेल. आप्पानी शिरमी आत आली. त्यांची निराशाली मनं वळखून बायजानं जो धीर दिला त्यानं आप्पाला आपलं पोट भरल्या सारख वाटलं पर उद्याची भूक आप्पाला धीर देत नव्हती.आप्पा जिथं बसला तिथंच पाण्याचं दोन घोट घेऊन तिथंच आडवा झाला. शिरमी भुकेच्या व्याकुळतेनं झोपी गेली पर बायजाचा डोळा लागत न्हवता. आप्पा इकडून तिकडं कुशी परतायचा तेच्या मणात दारिद्रया बद्ल बरच इचार येत व्हत. पर नाईलाज व्हता.

बायजाचा सकासकाळी डोला लागल्याला बघून आप्पानं जाड मुठीचे शेंड्याला थोडस वाकल्यालं खुरपं घेऊन तो घराबाहेर पडला. पडल्याल्या जागी आप्पा नाहीसा बघून बायजा एकदस भेबाटली. पर जास्त येळ न लावता आप्पा परत आला. तोही एका दिसाची तीन मानसांची भूक भागंल एवढी जुघळ्याच्या कणसांच गाठोड बांधून आनल व्हत. त्या दिवशीथंड पडलेली तीन दगडांची चुल आज ढणढणू लागली आप्पाच्या मणात कळत न कळत असा इचार येवुन गेला, जे आपल्याला

एकाद्याच्या हातापायापडून मिळत न्हाई ते आपल्याला चोरी करुन मिळतं .त्या दिसापासून आप्पा रात्री अपरात्री शिवारांतून हिंडू लागला आन जे मिळल तेनं तीन मानसांच पोट भरु लागला. आपन जे करतोय ते चांगलच करतो असं आप्पाला वाटून पाटलाच्या मळ्यावर दोनतीन येळा आप्पानं धाड घातली.

त्याच मांगवाडयात आप्पासारखी परिस्थिती अनेकांची व्हती पर त्याना मार्ग सापडत न्हवता तवा आप्पानं भैऱ्याला वगळता शिरपा, दौला दादबा यांना आपल्या हाताशी धरुन चोरी करण्यास सुरुवात केली पर आप्पाच सार काम तिथच आटापल ही बातमी वाऱ्यासारखी पाटलाच्या कानावर जावून आदळली आनं त्याच दुमावर पाटील कुऱ्हाडीला दांडा ठोकुन आपल्या मळ्यावर भैऱ्यामांगासोबत जावून बसू लागला.

कडूंस पडत चाललं व्हत रोजच्या सवयी प्रमाण आप्पा शिरपा व दौला यांच्या बरोबर पाटलाच्या मळ्याच्या दिशेनं चालला व्हता खांद्यावर फटकुर, हातात काठी, कंबरला आकड्यात आडक त्याला कोयता घेऊन आप्पा पेचऱ्याच्या बेळ्याला हात लावून डावा पाय आत टाकला पाठोपाठ शिरपा नी दौला बी व्हता चंद्राच्या मंद प्रकाशात जुधळ्याच धाट का हालत म्हणून जाळीच्या आडोशालाबसलेला पाटील दोन पावलं पुढ झाला. फुढयात आप्पाला बघून पाटलाची तळपायाची आग मस्तकाला गेली तोच पाटला बरोबरचा भैरु मांग फुड झाला आनं उरपाटी कुऱ्हाड करुन आप्पाच्या डोस्क्यात घातली. डोस्क्याला हात लावत आप्पा भिरबीटीसारखा कुपाच्या कडला जावून पडला. पडलेल्या आप्पाला बघून शिरपा नी दौला दीसलंत्या वाटेन पळू लागली पडलेला मुडदा भैऱ्यान पाठीला मारला आनं बावीच्या बाजूला पूरला.

बायजाला दौलाकडून हे कळताच बायजानं नी शिरमीनं हांबरडा फोडला .

माझा धनी गेला गं ... बाई.
पोटासाठी ....... पोटासाठी ........

## आधुनिक म्हणी

सुरेश टोपते
बी. एस्सी. भाग ३

१. पुढाऱ्याचे पोर गावाला थोर .
२. अती शहीणी तीची पर्स रीकामी.
३. प्रेमाच पडला त्यांचा हुंडा बुडाला.
४. प्रेमाच्या लग्नाला पंगती कशाला.
५. सरकात जेवू देईना, पदवी भीक मागू देईना
६. आजची युवती अडकली ब्युटीपार्लरमध्ये.

## वात्रटीका

व्ही. एस. शेणवी

सुणसुण पाखरा,
जा माझ्या कॉलेजा,
कमानी दरवाजा ,
त्यावर तू बस जा,
कॉलेजच्या सरांनां,
सांगावा सांग जा,
इंग्रजीच्या तासाला,
अम्ही नाही येत जा,
अम्ही नाही येत जा,

## टर ची करामत

अजीत फराकटे
बी. ए. भाग १

| | | |
|---|---|---|
| सिनेमाला | - | थियटर |
| एस. टी. ला | - | कंडक्टर |
| फिरावयास | - | स्कुटर |
| मारावयास | - | हंटर |
| खावयास | - | बटर |
| हॉटेलात | - | वेटर |
| प्यावयास | - | वॉटर |
| आजारास | - | डॉक्टर |
| दारुड्यास | - | गटर |
| थंडीस | - | स्वेटर |
| रंगविण्यास | - | पेंटर |
| कापण्यास | - | कटर |

# बदलती परिस्थिती आणि आजचा युवक

पाटील पी. एस्.
बी. ए. भाग २

आजवरच्या आपल्या देशाच्या इतिहासात जागृत क्रांतीकारी देश घडविण्यासाठी युवाशक्तीचा फार मोठा मोलाचा वाटा आहे. ज्यादेशाची युवाशक्ती जितकी सज्ञान, क्रांतीकारी आणि पुढ्य रलेली असेल तो देश नेहमी प्रगती पथावर असतो. पण आजच्या युवकाकडे अपेक्षेने पहात असतो तो उपेक्षाच पदरात टाकतो. आणि मग प्रश्न पडतो बदलत्या परिस्थीतीनुसार आजच्या युवकाची भूमिका आहे का ?

युवक कुणाला म्हणायचे ? ज्याच्या शब्दाना शस्त्राची धार आहे तो युवक, प्राप्त परिस्थिती बदलतो तो युवक, नवीन जग निर्माण करण्याची आस असते तो युवक पण असे युवक प्राप्त परिस्थितीत सापडतात का ? समाजाने इच्छिलेल्या भूमिका ते निभावतात का? या प्रश्नांची उत्तरे नकारार्थी द्यावी लागतात.

अगदी तारुण्याच्या सुरुवातीस मावळे जमा करुन हातात ढाल, तलवार घेऊन हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याची प्रतिज्ञा करणारे शिवाजीराजे कुठे आणि ऐन तारुण्यात हातात सायकलची चेन घेऊन महाविद्यालयावर हाणामारी करणारा विद्यार्थी कुठे ? ज्या ज्ञानेश्वरानी वया च्या १६ व्या वर्षी 'ज्ञानेश्वरी' लिहिली ते ज्ञानेश्वर कुठे? सारेच कसे दिशाहीन ?

आजचा तरुण ऐन तारुण्यात अमली पदार्थाच्या व्यसनाच्या विषवृक्षाचा सहारा घेतोय. त्यामुळे तो विषवृक्ष आपले हातपाय झपाट्याने पसरत आहे. आणी सारा तरुण वर्ग आतूनबाहेरुन पोखरत आहे. शहरी युवकापासून ते ग्रामीण युवकापर्यंत गुटखा खाणे एक व्यसन झाले आहे. या माझ्या बांधवाना मला सांगायचे आहे. गुटखा खाऊन आपण आपल्या व्यसनाची सुरवात करत आहोत पण गुटखा खाता खाता गुटखा होऊन आपल्या जीवनाचा शेवट करु नका. गर्दसारखी व्यसनं लागुन सर्द बनन्यापेक्षा मर्द बनायला शिका.

एक नायक शंभर बंदुका समोर असताना त्याना हरवू शकतो. वास्तव जगात एखादा चाकू पुरेसा आहे. बकाल वस्तीतला नायक कोट्यावधी रुपये मिळवू शकतो हे सिनेसात ठीक आहे . वास्तव जग मात्र वेगळे आहे. या सिनेमांनी सर्व तरुणांच्यांत फार मोठा वाईट असा बदल घडवून आणला आहे. प्रत्येक युवक सिनेमातील हिरोप्रमाणो फॅशन करायला निघाला आहे आणि तो वाया जात आहे घराघरांचा सिनेमा झाला आहे. हेच चित्र आपण घराघरात पहातो आहोत.

बदलत्या परिस्थीतीचा विचार न करता सर्व युवक अन्य मार्गाने जात आहेत. याला कारण आहे ते म्हणजे सद्याचे राजकारण आणि समाजरचना. युवक हा एक समाजाचा घटक आणि राजकारण समाजाचा अविभाज्य भाग बनला आहे. या राजकारणतील अंदाधुंदी डावपेच, लहानमोठेपणाचा वाद, खुर्चीसाठी भांडणे या गोष्टी

युवक नुसता पाहत नाही. तर राजकारणी लोक सर्व बेकार युवकांचा स्वतःच्या स्वार्थासाठी उपयोग करून घेत आहेत. ह्या राजकारण्याना युवक बळी पडण्यापाठीमागे मोठं कारण आहे ते म्हणजे सुशिक्षित बेकारी. नोकऱ्या मिळवण्या साठी आजचा युवक काहीही करण्यास तयार असतात.

आजच्या युवकाना समाजातील या बेशिस्तपणामुळे अनेक भुरळी पडत आहेत. कधी त्याना भुरळ पडते दाऊद इब्राहिमची, कधी प्पपू कलानीची तर कधी टाडाखाली अटक असणाऱ्या संजय दत्तची.अशा युवकाना भुरळ पडायला हवीहोती गांधी नेहरुंची, बाबा आमटें अशा क्रांतीकारी माणसांची. तरच हे युवक मार्गावर येतील.

आजच्या स्पर्धेच्या जगात टीकायचे असेल तर प्रत्येक युवकाने बदलत्या परिस्थितीचा म्हणजेच जगाच्या प्रगतीचा ह्यामानाने आपल्या देशाच्या प्रगतीचा आणि त्याचबरोबर स्वतःच्या प्रगतीचा विचार करायला हवा. कोणतेही पाउल उचलताना आयुष्याच्या परिस्थितीचा विचार करणे आजच्या युवकाला अत्यंत गरजेचे आहे. अशाप्रकारे सर्वांनीच म्हणजे सर्व युवकानी एकोप्याने आणि बदलत्या परिस्थिती नुसार विचार करायला आणि तशाप्रकारे वागायला हवे. यातच देशाची आणि स्वतःचीही प्रगती झाल्याशिवाय रहाणार नाही.

## हसा आणि हसवा

दशरथ दिनकर वरोरे
बी. ए. भाग १

१. '' हे दंतवैदय कसे काय आहेत ? चांगले दात काढतात का हो ? ''

'' हो, चांगलेच दात काढतात. परवा मी त्याचेकडे देलो होतो तेंव्हा त्यांनी चागलाच दात काढला !''

२. '' बसमध्ये गर्दीत एका युवकाने तरुणीला स्पर्श केला तेंव्हा तिने रागाने विचारले, '' ए मिस्टर काय करता आपण?'' तो तरुण ताबडतोब उत्तरला, '' एका प्रायव्हेट कंपनीत नोकरी !''

३. ''काल रेसला गेला होतारा? काय नशीबान हात दिता का ?''

'' हो तर । एका लाखाच्या कारनं रेसला गेलो आणि पाच लाखाच्या बसने घरी आलो !''

४. पेशंटला तपासल्यावर गंभीर चेहऱ्याने डॉक्टर म्हनाले, '' तुम्ही काही मिनीटांचे सोबती आहेत तेंव्हा तुम्हाला आणखी कोणाला भेजायचे आहे काय ?''

'' हो, दूसऱ्या डॉक्टरला । '' पेशंट क्षीण आवाजात म्हनाला

# सर्प विश्व

अतुल मानसिंगराव देसाई
बी. एस्सी. भाग ३

सर्पाची एकंदर १३ कुलांत विभागणी केली आहे. त्यातील सर्वात जास्त लांबीचा नाग हा ब्रम्हदेश, थायलंड येथे आढळतो. त्याची लांबी ५.४ मी. इतकी असते व आफ्रिकेतील सर्पाची लांबी ४.२ मी. इतकी असते अमेरीकेतील विषारी सापांच्या ''बुश मास्टर'' या सापाची लांबी २.४ मी. असते. ऑस्ट्रेलियातील विषारी जातीचा साप ''तैपान'' असून तो ईलापूडू कुलातील आहे त्याची लांबी ३.३मी. इतकी असते.

विषारी सापातील जगात भारी वजनाचा साप आफ्रिकेत आढळणारा 'गबुन मंडली' हा असावा असा अंदाज आहे. त्याचे वजन नऊ किलो भरु शकते. जगातील लहान लहान सर्प टिक्लोनिडी व लेफ्टोटिफ्लो निडी या दोन बिन विषारी कुळात आढळतात या कृशकाय सर्पाची लांबी १२५ मी.मी. ते १५० मी.मी. असून घेर जेमतेम २० मी.मी. असतो. त्याचे वजन ही कांही ग्रॅमच्या पलिकडे जात नाही.

ऑस्ट्रेलियातील वाघ्र सर्पाचे वीष सर्वात जास्त विषारी आहे. समुद्र सापाचे विषही प्राणहानिकारक असते. समुद्रसापाचे १.४ मायक्रोगॅम विष १८ ते २० ग्रॅम च्या उंदराला मारु शकते. भारतातील पट्टेरी मण्यार चे विष सर्वात विषारी आहे. १.१ मायक्रोग्रॅम वीष १८ ते २० ग्रॅम वजनाच्या उंदराला मारू शकते. त्यापेक्षा नागाचे वीष सौम्य असते कारण इतक्याच वजनाच्या उंदरास मारण्यास त्याला ८ ग्रॅम विष टोचावे लागते.

आशिया खंडात जास्तीत - जास्त संख्येने विषारी साप तर त्यातील जास्तीत जास्त ऑस्ट्रेलिया मध्ये आहेत. शास्त्रज्ञांच्या मते २० टक्के विषारी साप असावेत पण ७५ टक्के विषारी साप फक्त ऑस्ट्रेलिया मध्ये आढळतात, व्याघ्र नावाचा साप प्रजनन क्षमतेत आघाडीवर असून त्याची मादी एकावेळी ५० पिलांना जन्म देते. धोणस, फुरसे हे सर्प सुद्धा पिलाना जन्म देतात, तर नाग व मण्यार हे सर्प अंडी घालतात. एकवेळी जन्म दिलेल्या पिलांची किंवा अंडयांची संख्या चार पासून शंभर पर्यत असू शकते. आफ्रिकेतील एका 'पफ ॲडर' यासर्पाने नैरोबी सर्पोदयानात १९७१ मध्ये १३१ जिवंत पिलाना जन्म दिला. एका वर्षात सर्प दंशाने जास्तीत - जास्त माणसे ब्रम्हदेशात मरण पावली आहेत. त्यावेळी एकाच सर्पाने २१ माणसे ठार केली आहेत.

बॉयडी व पायथॉनिडी नावाने ओळखल्या जाणाऱ्या बिनविषारी कुलांतील सर्पाची लांबी सर्वात जास्त असते. वजनाने ही ते जास्त असतात. अमेरीकेतील बॉयडी कुलातील अनाकोंडा जातीच्या सर्पाची लांबी सरासरी १२ मी. व वजन ६५० किलो असते पायथॉनिडी कुलातील आशियातील सर्वात जास्त लांब अजगराची लांबी १० ते १२ मी. असते.

बॉयडी, पायथॉनिडी, टिफलोनिडी व लेफटोरिफलोनिडी या चार कुलांतील काही सर्पानां दोन फुफुसे असतात परंतु सीधारणपणे बहुतेक सर्पामध्ये पुर्णतया व व्यवस्थित वाढलेले एक फुफुस

आढळते व दुसरे फुफुस अगदीच अविकसीत असते. मानव आपला जबडा ३० चा कोन करु शकतो, तर बहुतेक सर्प ९० चा कोन होईपर्यंत आपला जबडा सहज उघडू शकतात आफ्रिकेत आढळणारा एक 'डॅसिपेल्टिस स्काब्रा' नावाचा सर्प स्वतःच्या देहाच्या ४ ते ५ पट मोठे असे अंडे तो जबडा सताड उघडून गट्ट करु शकतो.

सर्पाचा पाचक रस जगातील एक भयंकर रसायन असावे कारण त्यात कठिणातील कठिण कवचे आणि जनावरांची हाडे विरघळतात. केवळ केश, शिंगे आणि खुर याच्यावर त्याचा काही परीणाम होत नाही.

सर्पाला बाहयकर्ण व अंतकर्ण नसतात, सापाना आवाजाचे दिशेने ज्ञान जमिनीपासून मिळणाऱ्या कंपापासून होत असते. नैरोबिच्या स्किनरच्या मते अशा प्रकारे आवाज ग्रहण करण्याची शक्ती नागांमध्ये जास्त असावी, कारण ५० मी अंतरावरुन अनवाणी चाललेल्या माणसाची चाहुल नागाला लागते.

अमेरीकेत रॅटल नावाच्या सापाच्या शेपटीत मांसल वलये असतात हा साप सरपटताना खुळ खुळा वाजल्याचा आवाज येतो म्हणून या सर्पाला 'रॅटल' हे नाव पडलेले आहे. हे सर्प फुफुसाच्या ऐवजी हे वलय एकमेकावर आपटून आवाज काढतात.

मालागासी या उष्ण कटीबंधीय प्रदेशात एक ही विषारी साप आढळत नाही.

सापाचे आयुष्यमान २५ ते ३० वर्षे असावे असा अंदाज आहे. भारतीय अजगरे एका प्राणी सग्राहालयात ३१ वर्षे, दक्षिण अमेरीकेतील अमाकोंडा २९ वर्षे आणि आफ्रिकेतील एक नाग २५ वर्षे जगल्याची नोंद आहे.

## भुमिती पत्र

कु. पुष्पलता डी. पाटील
बी. ए. भाग ३
मु. पो. समांतर रेषा,
ता. लंबातर रेषा,
जि. परिमिती, पिन. ३,२१३९६.

प्रिय व्यास यांना,

स. न. वि. वि.

आता पत्र लिहिण्यास कारण की, बरेच दिवस झाले तुझे पत्र आले नाही. कालच बहुभुजाकृतीचे पत्र आले. इकडे पंचकोन व अंतरालेखित कोन बरे आहेत काळजी नसावी. परवाच विषमभुज चौकोनाचे विशालकोन येऊन गेले. त्याच्या बरोबर चक्रीय चौकोनाचे लघुकोनही आले होते.

चौरसाकडून असे समजते की, समभुज चौकोना ची तब्येत बरी नाही. त्यासाठी डॉ. त्रिकोण यांना बोलावून योग्य तो उपचार करावा त्यातूनही बरे न वाटल्यास कोनमापकाचा रस काढून अर्धवर्तुळाची पुड करुन कंकटमध्ये घालून इंजक्शन दयावे, असे मत डॉ. दंडगोल सांगतात. त्यामुळे प्रकृती सुधारेल. त्यांची आई वर्तुळाबाइ व वडिल आयत सध्या बरी आहेत.

तसेच, पाया व रेषा यांना नमस्कार, कंस, बिंदू, ठेदिका यांना आशीर्वाद व छोट्याशया त्रिज्येला गोड गोड पापा.

इकडील सर्व ठीक.

आपला
परिघ

# आणि लोकशाहीचा ऱ्हास झाला

संजय केरबा कांबळे
बी. ए. भाग २

आज आपला देश स्वतंत्र होउन ४८ वर्षे पूर्ण झाली. आपल्या या महान देशाची घटना २६ नोव्हेंबर १९४९ इ. रोजी भारतीय घटना समितीने भारतीय राज्यघटना लिहून पूर्ण केली आणि घटनात्मक कायद्याच्या स्वरुपात या राज्य घटनेचा भारतीय जनतेने स्वीकार केला. २६ जानेवारी १९५० रोजी या राज्यघटनेची अमलबजावणी सुरु झाली म्हणूनच घटनेनुसार याच दिवशी भारतीय प्रजासत्ताकाचा जन्म झाला. २ वर्षे ११ महीने १८ दिवस काम करुन घटनेच्या शिल्पकारांनी भारतीय राज्यघटना तयार केली. जगातील ही सर्वांगसुंदर राज्यघटना ! लिखित स्वरुपाची, प्रदीर्घ अशी राज्यघटना आहे. १८५७ पासून अनेकांनी आपल्या सर्वस्वाचं बलिदान देऊन या देशाला स्वतंत्र केले. पारतंत्र्यात असताना परकीयांनी केलेली पिळवणूक निर्माण केलेली आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक गुलामगिरी यातून भारतीयांना मुक्त केले `हा राष्ट्रीय संघर्ष चालू असतानाच स्वतत्र भारताची स्वप्ने पाहात या स्वातंत्र्यविरांनी आपल्या प्राणांचे बलीदान दिले. ती स्वप्ने साकार व्हावीत एक नवा भारत निर्माण व्हावा, या स्वतंत्र भारतात गरीब - श्रीमंत, उच्च-नीच हे भेद कमी व्हावेत सर्वांना आपल्या व्यक्ति मत्वाचा विकास करन्यासाठी समान संधी लाभावी. या मूळ हेतूनेच घटनेच्या शिल्पकारांनी ही राज्यघटना तयार केली. पण त्यापैकी किती स्वप्ने गेल्या ४८ वर्षात साकार झाली? किती भारतीयांना आपल्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास करता आला ? आतापर्यंत या देशातील सामाजिक किंवा आर्थिक विषमता किती कमी झाली? आणि याच्याही पेक्षा वेगळ्या स्वरुपात सांगावयाचे झाल्यास राज्यघटनेने निर्माण केलेल्या संसदीय लोकशाहीला किती प्रमाणात यश प्राप्त झाले?

पण तसे पाहता गेल्या ४८ वर्षाचा आढावा घेतल्यास दुर्देवाने आपल्याला असे कबूल करावे लागते की जगातील ही सर्वात मोठी लोकशाही आपले कर्तव्य काय हेच पार विसरुन गेली आहे. इंग्लंड सारख्या संसदीय शासम प्रणाली अलेल्या देशापासून आपण ही संसदीय लोकशाही स्विकारली आहे. परंतु तिची प्रत्यक्षात अमलबजावणी करताना मात्र अनेक लोकशाही संकेत पायदळी तुडविले, लोककल्याणकारी कायदे केले, मात्र त्यांचा अंमल करताना त्यांचा मूळ हेतू कितपत साध्य होतो आहे याकडेच दुलर्क्ष केले. सत्तेचे विकेंद्री करण, राष्ट्रीय संपत्तीचे विकेंद्रीकरण यासारख्या उदात्त तत्वांचा सतत पाठपुरावा करण्याचा मात्र आव आणला, मात्र प्रत्यक्षात सत्ता आणि समाजातील काही मूठभर लोकांच्या हातात एक,वटली आणि या संपत्तीचा, सत्तेचा त्यानी दुरुपयोग स्वार्थासाठी केला राजकीय सत्तेचा उपयोग कुमार्गाने संपत्ती मिळविण्यात आणि सत्तेच्या जोरावर सर्व सामाजिक नीतिमूल्ये लाथाळण्यात या नव्या राजकर्त्यांनी आघाडी मारली. त्यामुळेच सर्वत्र अत्याचार, भ्रष्टाचार,

लाचलुचपत यांचा सुळसुळाट झाला. ज्यांनी कायद्याची अमलबजावणी करावयास हवी होती तेच कायदे माडीत काढताहेत. ज्यांच्याकडून संरक्षणाची अपेक्षा बाळगली जाते तेच भक्षक झाले . असं का घडतय? रोजच अस का घडतय ? या प्रश्नाचे उत्तर शोधताना आपल्याला असे लक्षात येईल की, आपण जरी पाश्चात्य देशांकडून अतिशय उत्तम अशा राजकीय तत्वाचा स्वीकार केलेला असला तरी या तत्वांची अंमलबजावणी करण्यासाठी सर्वसामान्य जनतेमध्ये या तत्वांसाठी आवश्यक असलेली आस्था नव्हती यातत्वाची अमलबजावणी करण्याचा प्रामाणिकपणा आमच्या राज्य कर्त्यामध्ये नव्हता. आपल्या या लोकशाही पद्धतीत लोकांनी निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधीमधून बहुमत मिळालेला पक्ष राज्य करु लागतो. मंत्रीमडळ कायदेमडळाला जबाबदार असते. इंग्लंडमध्ये निवडणुका झाल्यानंतर अतिशय अल्पशा बहुमतात असलेला पक्ष पाच वर्षे बिनधास्तपणे राज्य करु शकतो पण आपल्या देशात मात्र एका पक्षाच्या राजकीय कार्यक्रमांवर निवडून आलेला उमेदवार अतिशय निर्लज्जपणाने ज्या मतदारांनी आपल्याला निवडून दिले आहे. त्यांची अजिबात पर्वा न करता दुसऱ्या पक्षात प्रवेश करु शकतो. कधी कधी तर ही संख्या इतकी मोठी असते की आयाराम - गया रामांच्या देशात बहुमतात असलेला पक्ष अल्प मतात जातो आणि अल्पमतात असलेला पक्ष बहुमत सहज प्राप्त करु शकतो आणि राज्यकर्ता होवू शकतो. या पक्षांतरावर बंदी आणण्यासाठी आमच्या संसदेने कायदा केला पण त्यातही पळवाटा ठेवल्या त्या अशा की, एक दोन सभासदांनी पक्षांतर केले तर तो या कायद्या नुसार गुन्हा ठरतो परंतु ही संख्या जर १/३ असेल तर मात्र हे पक्षांतर गुन्हा ठरतच नाही तर ते म्हणे कायदेशीर योग्य ठरते.म्हणजेच याचा अर्थ असा की एकंदरीत दोन - चार लोकानी गुन्हा केला तर तो कायदेशीर गुन्हा ठरतो आणि दहा - पंधरा लोकांनी गुन्हा केला तर तो कायदेशीर गुन्हा ठरत नाही, मला वाटते जगात असा कायदा केवळ भारतातच असू शकेल . याबाबतीत काही राजकीय निरीक्षकांचे असे मत आहे की भारतीयांना मुळात लोकशाही शासनप्रणालीची सवय कधीच नव्हती कारण प्राचीन काळापासूनच भारतीय लोकाना राजेशाहीची सवय लागलेली होती. एकंदरीत लोकशाही शासनप्रणाली ला आवश्यक असलेली पार्श्वभूमी या देशात कधीच तयार झाली नाही आणि होत नाही आहे. आम्ही ही तत्वे पाश्चात्यांपासून उसनी घेतली खरी मात्र यादेशाच्या मातीत ती रुजली नाहीत, वाढली नाहीत बाहेरुन दिसायला केवळ देखावा लोकशाहीचा राहिला मात्र आतून राजेशाही आणि घराणेशाहीच राज्य करीत राहील्या लोकांनीही या पद्धतीचा निमुटपणे स्वीकार केला त्यामुळेच पुर्वीचे राजे असलेले संस्थानिक सहज निवडून येवू शकतात. आज तर एखादा आमदारखासदार मरण पावला तर त्याची पत्नी,मुलगा काहीही काम न करता अगदी सहज निवडून येऊ शकतो, नेहरुनंतर इंदिरा गांधी, आणि गांधीनंतर त्यांचा पायलट असलेला मुलगा पंतप्रधान होऊ शकतो. बहूतेक मुख्यमंत्री आमदार - खासदार यांचीच मुले किंवा नातेवाईक हे निवडणुका लढवून सहज निवडून येऊ शकतात. कारण आम्ही घराणेशाही राजवट मनोमन स्विकारलेली असते, लोकशाहीच्या तत्वात हा असला घाणेरडा प्रकार बसूच शकत नाही. इंग्लंडच्या पंतप्रधानाचा मुलगा क्वचीतच पंतप्रधान होतो आणि अमेरीकेच्या राष्ट्राध्यक्षाचा मुलगा क्वचितचअमेरीकेचा राष्ट्राध्यक्ष बनतो.

एखाद्या विशिष्ट राजकीय तत्वप्रणालीचा स्विकार केला तर तिला पोषक असलेली इतर तत्वे जपावी लागतात. हेतुपुरस्कर पणे त्यांची वाढ करावी लागते. इंग्लंडमध्ये एखाद्या मंत्र्यावर गंभीर आरोप केले तर तो लागलीच राजीनामा देऊन बाहेर पडतो. कारण त्या आरोपांमध्ये थोडेफार तरी तथ्य असल्याची खात्री इतरांची (पंतप्रधान इतर मंत्री, जनता) आणि त्याची स्वतःची पटलेली असते. आमच्या देशात सर्वांची खात्री पटली तरी राजीनामा देऊन बहेर पडण्याचे नैतिक सामर्थ्य फारसे कुणामध्ये उरलेले दिसून येत नाही. नेहरुंच्या

काळात अनेकांना ज्या घटनांसाठी राजीनामा द्यावा लागला त्या घटनांच्या कितीतरी पट आज भयानक घटना घडूनही जसे काय काहीच झाले नाही असे समजून राज्यकर्ते वागताहेत. कोट्यावधी रुपयांचा बँक रोखे गैरव्यवहार होऊनही त्याला जबाबदार असणाऱ्या व्यक्तीवर कोणतीही कारवाही होत नाही. उलट हा बँकाच्या कार्यपद्धतीचा दोष आहे असे सांगून आमचे पंतप्रधान त्यात दोषी असलेल्या व्यक्तीवर कारवाई करण्यास तयार नाहीत. त्यासाठी नेमलेल्या रामनिवास मिर्धा या संसदीय समितीचे निष्कर्शही आमच्या मंत्री मडळाला मान्य नाहीत. असे प्रकार रोखे गैरव्यवहारातच घडले असे नाही. राजकीय भ्रष्टाचाराला आळा घालता यावा यासाठी लोकआयुक्ताची नेमणूक करण्यात आली. परंतु लोकआयुक्तानी दोषी ठरवलेल्या व्यक्तीना भ्रष्टाचाराचे बक्षिस म्हणून पदोन्नती दिली. तर बोफोर्स सारख्या भ्रष्टाचारात राजीव गांधीचे सरकार गळ्यापर्यंत रुतलेले असूनही त्याबद्दल नीट चौकशी होत नाही करायचीच नाही कारण भ्रष्टाचाराच्या बाबतीत 'एकमेका साह्य करु! अवघे धरु कुपंथ। हाच मंत्र सद्या राजकारणी मंडळी जपत आहेत आता हे सर्व प्रकार काही काँग्रेसच्याच राजवटीत चालतात असे नाही. याबाबतीत कोणताही पक्ष इतरापेक्षा अधिक चागला आहे अशी परिस्थिती नाही. एकूण काय तर काँग्रेस पक्ष असो किंवा इतर कोणताही पक्षं असो स्वार्थ साधण्यासाठी ते सतत एकमेकांना मदत करीत असतात.

या सर्व गोष्टींची युती आणि त्यामुळे होत असलेले भारतीय लोकशाहीचे वस्त्र हरण पाहिले की ज्यांनी हे स्वातंत्र्य मिळविले त्यासाठी तुरुंगवास भोगला सर्वस्वाचे बलिदान दिले त्याना काय वाटत असेल हा विचारही अगदी असह्य होतो. जळगाव वासनाकांड, देशभर घडत असलेली बलात्काराची प्रकरणे, गुंड आणि राजकारणी लोक यांची अपपवित्र युती आणि त्यामुळे निर्माण झालेली असुरक्षितता, देशभर वाढत असलेला भ्रष्टाचार आणि भ्रष्टाचारी व्यक्तीना प्राप्त झालेली प्रतिष्ठा या सर्वाचे एकमेव कारण म्हणजे या देशातील व्यक्तिगत आणि सामाजिक नीतीमत्तेचा झालेला ऱ्हास आणि त्याच बरोबर देशाला लाभलेले भ्रष्टाचारी राजकर्ते हेच होय ...... आणि लोकशाहीचा ऱ्हास झाला.

## कोल्हापूर : चित्रपटगृह कुटुंब

डी. बी. पाटील
बी. एस्सी. भाग ३

गेली कित्येक वर्षे कोल्हापूर शहरात केशवराव भोसले आणि उषा या दोघांचे कुटुंब रहात आहे. त्यांना तीन मुले, एक मुलगा व दोन मुली. थोरला शाहू मधली उमा व धाकटी पद्मा या कुटुंबावर सरस्वतीची चांगलीच कृपा असल्याने सर्व मुले हुशार आहेत. त्यामुळेच त्यांच्या घरात लक्ष्मी नांदत आहे. पार्वतीच्या वरत - हस्तामुळे त्यांचा संसार रॉयल चालला आहे.

एके दिवशी प्रभात समयी उमाची व अयोध्येहून आलेल्या बसंतची भेट झाली बसंतला ती जणू अप्सराच वाटली. दोघे एकमेकांवर प्रेम करु लागले. पुढे काही दिवसानी व्हीनसला साक्षी ठेवून दोघे शाहू स्मारक भवन येथे विवाहबद्ध झाले. त्यांचा संगम झाला आणि त्यांच्या जीवनात बहार फुलला

# प्रेम

*प्रेम - कोणावर करावं,*
*योगावर करावं,*
*भोगावर करावं,*
*त्याहूनही अधिक त्यागावर करावं ।*
*- कुसुमाग्रज.*

सुभाष सुर्यवंशी
बी. ए. भाग १

प्रेम, प्रेम, प्रेम ! हा एक शब्द व अडीच अक्षरे. परंतु अडीच अक्षरांमध्ये कितीतरी मोठा अर्थ भरुन राहिलेला आहे. प्रेम म्हंटले की, आपल्यासमोर दोन प्रेमी युगलांचे प्रेम उभे राहते. पण प्रेमाचा इतका संकुचीत अर्थ लावणे चुकीचे ठरेल.

प्रेम हा एक सनातन काव्याविषय आहे. अनेक वर्षापासून अनेक कवी प्रेमावर कविता लिहित आले. तरीपण त्यातली गोडी नष्ट झाली नाही. प्रेमानुभवाच्या विविध छटांनी रंगलेली कविता वाचताना रंगून जाणार नाही, असा रसिक विरळाच, कवी आणि रसिक दोघेही ज्यामध्ये रंगून जातात असे, ते प्रेम म्हणजे काय ? हे जरी सांगता आले नाही तरी, त्यावद्दलचे आकर्षण मात्र कधीही कमी होणार नाही, हे मात्र निश्चितपणे सांगता येईल. म्हणूनच प्रत्येक कवी आपली प्रेमकविता विविध कल्पनांनी नटवताना दिसतो. आणि या कल्पना पुष्कळदा पारंपारिक व सांकेतिक असल्यातरी वाचक त्या वाचताना कांही प्रमाणात का होईना, रंगून जातो. आणि नवन-वोन्मेशालिनी प्रतिभेचा एखादा कवी, जेंव्हा आपल्या कवितेतून प्रेमानुभवाच्या नविनच छटा दाखवतो. काहीशा अस्पष्ट धुसर परंतु हुरहुर लावणाऱ्या भावस्थितीचे चित्रण करतो, प्रेमानुभवातील मनोरम्य नाट्याबरोबरच त्याच्या शारीर अंगाचे कानांच्या तारा छेडणारे चित्रण करतो, तेंव्हा ते वाचत असताना धुंद होणार नाही असा वाचक सापडणे अशक्यच ! असे बाळकृष्ण कुवठेकर आपल्या वाड्मयीन चर्चा आणि चिकित्सा, यांग्रहामध्ये म्हणतात. तसेच केशवसुत, गोविंदाग्रज भा.रा. तांबे, गडकरी, ना. घ. देशपांडे, पु. शि. रेगे, इदिरा संत, माधव ज्युलियन अशा अनेक मराठी कविनी प्रेम कविता लिहिल्या. त्यामूळे प्रेम या विषयास उदात्त दर्जाचे स्थान प्राप्त झाले आहे असे आपणास म्हणावे लागेल.

प्रेम हे कित्येक माणसांच्या जीवनाशी निगडीत आहे. प्रेम आणि जीवन या दोन शब्दांना वेगळे करताच येणार नाही. प्रेम आहे म्हणून जीवन आहे. जीवन ही प्रेमाची रंगभूमी आहे. चांदण्यामुळे कुमुदीनी चा विकास होतो. त्याच प्रमाणे प्रेमाविलासाने जीवनाचा विकास होतो. अमृतापासून माधुर्य, दिप ज्योतीपासून तेज अलग करता येईल का ? फुलापासून सुगंध वेगळाकरता येईल का? प्रेम करणे जीवनातील स्थायी भाव आहे. ते एक अविभाज्य अंग आहे. म्हणूनच गडकऱ्यांनी म्हटले आहे की,

'क्षण एक पुरे प्रेमाचा ! वर्षाव पडो मरणाचा मग पुढे।'

ते अगदी खरेच आहे तसेच साने गुरुजी यांनी म्हटले आहे.

''खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे ! ''

यातून साने गुरुजीनी केवढा मोठा संदेश दिला आहे संपूर्ण जगावर प्रेम करा असे त्यांनी सांगितले आहे.

प्रेमाविना जीवन ते कसले? प्रेमाविना जीवन म्हणजे मृत्यू ! प्रेम विरहीत जीवन जगणारी माणसे म्हणजे जिवंत प्रेते. प्रेम हीभावना एकच असलीतरी माणसे त्याची रुपे मात्र मेगवेगळी आहेत

**ईश्वर प्रेम** - जसे मुलाचे आईवरती असणारे मातृ प्रेम त्याच प्रकारचे कांही भक्ताचे प्रेम हे परमेश्वरावर असलेले दिसून येते. संत तुकाराम, संत ज्ञामेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ या थोर संतानी परमेश्वरावरती अत्यंत मनोभोवे प्रेम केलेले आहे. संत तुकारामांनी या विश्वात असणाऱ्या सर्व सजीवांना परमेश्वराचीच रुपे मानलेली आहेत स्वतःच्या शेतात केलेल्या पिकावरती जरी एखादं पाखरु बसलंतरी त्याला उठवून घालविण्याचे धाडस संत तुकारामांना होत नव्हते हे केवळ परमेश्वराच्या प्रेमा पोटीचना? एवढेच नव्हेतर धान्य खाऊन त्यांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध करुन देणारे संत तुकाराम ईशवर भक्तीत इतके गुतंलेले होते की त्यानी स्वतःच्या संसारात दुर्लक्ष करुन आपला सर्व वेळ परमेशवराच्या चितंनात घालवला तो प्रेमापोटीच ना! तसेच काही ऋषीनी परमेश्वराला प्रसन्न करुन घेण्यासाठी ध्यानस्थ समाधीस बसल्याचे आपण काही धार्मिक ग्रंथात वाचलेले आहेच. समाधी कितपत मन लावून सुरु केलेली आहे यासाठी परमेश्वरानी कांहीवेळा त्याची समाधीभंग करण्यासाठी भुंग्याचे रुप घेऊन शरीर कुरतडण्याचे कृत्ये केले, पण किंचीतही न हालता समाधी तशीत पुढे चालू ठेवली ती फक्त ईश्वर प्रेमा साठीच.

यावरुन या संताच्यामध्ये किती ईशवर प्रेम आहे .याची जाणीव झालेली आपणास दिसून येते.

**पती – पत्नी प्रेम** : पती - पत्नीचे प्रेम म्हणजे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत दोन्हींना समानच मूल्य आहे. पती नसेल तर पत्नीला किंमत नाही आणि पत्नी विना पतीला किमंत नाही. म्हणजेच हे दोन्ही जीव एकमेकांशी सतत एकरूप असतील तरच त्यांना पती पत्नी म्हणता येईल ही एकरुपता स्वाभाविकच त्यांच्यामनामध्ये निर्माण झालेली असते. इतके त्यांचे पती - पत्नी प्रेम निर्माण झालेले असते की, ती दोघे एकमेकांपासून अलग राहूच शकत नाहीत ? केवळ प्रेमासाठीच ना !

यावरुन प्रेम हे किती उदात्त आणि व्यापक आहे याची जाणीव आपणास कळून येते.

**मित्र प्रेम** -: प्रत्येकाने आपल्या आयुष्यामध्ये कोणता मित्र निवडावा हे ज्याच्या त्याच्या स्वभावावर अवलंबून असते. आपण जर वाईट मित्राशी मैत्री करु लागलोतर त्याच्यासारखेच आपनण सुद्धा वाईट बनू शकतो. त्याच्या व्यसनी आपण आकलन करु शकतो आणि चांगल्या मित्राशी जर मैत्री करु लागलोतर त्याच्यांसारखेच आपण काहीतरी प्राप्त करु शकतो. हे आजच्या युवकांनी जाणून घेतले पाहीजे.

आपलाच मित्र संकटात अगर कोणत्याही अडचणीत असेल तर आपण धावत जावून त्याच्या दुःखात,अडचणीत, संकटात सहभागी होतो, केवळ प्रेमासाठीच . प्रेम या अडीच अक्षरामध्ये किती शक्ती दडली आहे यावरुन आपणास कळून येते.

**बहिण – भावाचा जिव्हाळा** -: आई प्रमाणेच बहिण भावाचे प्रेम हे किती उदात्त असलेले पहावयास मिळते बहिण –भाऊ हे दोन्ही एकमेकांवर अतिशय मायेने प्रेम करत असतात. भावाला आपल्या बहिणीची माया ही रक्षाबंधन या सणादिवशी कळून येत असते. ज्यावेळी बहिण आपल्या भावाला राखी बांधते आणि पुढील आयुष्याची जबाबदारी ही भावावर टाकते त्यापासून बहिणीवर कशाप्रकारे प्रेम करावे हे कळून येते. यावरुन प्रेमा मध्ये किती मोठा अर्थ दडलेला असतो हे भावाला समजते.

उदा. -: मानलेल्या भावाच्याबोटाची जखम आपल्या शालूचा पदर फाडून बांधनारी द्रोपदी हिचे प्रेम सुद्धा आदर्श बंधु प्रेमाचे उदाहरण आहे.

**आईचे वात्सल्य** -: मुलाची पहिली शाळा म्हणजे

आई. आपल्या लहान मुलाला प्रेमाने वागवत असते. आपला मुलगा शहाणा व्हावा या आशने आई कठोर परिश्रम घेत असते. वाईट प्रवृतीपासून मुलाला दूर ठेवण्याचे कार्य आई करत असते. एका कथेमध्ये आईचे प्रेम हे किती उदात्त असते ते पटवून आपल्याला दिले आहे. मुलगा हाआपल्या बायकोच्या प्रेमापोटी आपल्या आई चे काळीज घेऊन जात असताना वाटेत त्याला ठेच लागुन पडतो त्या वेळी त्या आई चे काळीज त्या मुलाला म्हणते ''बाळ कोठे लागले तर नाही ना ? यावरुन आपल्या आईच्या प्रेमाची जाणीव आपल्याला होते.

**तरुण तरुणीची प्रिती -:** प्रेयसीने प्रेम करुन आपल्या प्रिय कराला वाईट गोष्टीपासून दूर ठेवला पाहिजे. त्याला चांगल्या मार्गाला लावले पाहिजे कारण हे फक्त प्रेयशीच करु शकते. प्रेयसी आणि प्रियकर हे एकमेकांवर अतिशय प्रेम करत असता तसेच प्रिय कराने सुद्धा प्रेयसीला चांगला मार्ग दाखविला पाहिजे हेच फक्त प्रेम आयुष्यात सफल होऊ शकते, म्हणजेच तरुण - तरुणी ह्या दोन व्यक्ती एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. या दोन व्यक्ती एकमेकांवर उत्कटतेने प्रेम करत असतात व या व्यवहारी जगाला तोंड देऊ शकतात म्हणून प्रेम ही एक अशी गोष्ट आहे त्याला जगातली कोणतिही ताकद आडवू शकत नाही.

उदा. : आपल्या प्रेयसीसाठी भटकत फिरणारा इतिहासा तील मजनु यांचे हे आदर्श प्रेयसी विषयीचे प्रेम आहे . जगात जर आदर्श प्रिती नसतीतर ताज महालसारखी अप्रतीम कलाकृती जन्मासच आली नसती आणि लैला - मजनु च्या नावाने इतिहासातील पाने उजळली नसती.

वरील प्रकारे प्रेमाची विविध रुपे आपल्याला दिसून येतात प्रेमाची ही सर्व रुपे मानवी जीवनात विकसीत होत असतील तरच मानवी जीवंनास पूर्णत्व येते.

ज्या व्यक्तिचे जीवन आदर्श ती व्यक्ती आदर्श. मग ती व्यक्ती कोणतिही असो. आदर्श माता असो, आदर्श प्रेयसी असो, आदर्श पुत्र असो वा आदर्श बंधू असो त्यांच्या आदर्श भूमीमूळे त्या सर्व व्यक्ती वंदनीय ठरतात आदर्श प्रेमाची उदाहरणे पहावयाची म्हटल्यास तर आपणास इतिहासाच्या साक्षीने कितीतरी उदाहरणे पाहता येतील आपला इतिहास असे सांगतो, ''प्रत्येक कर्तृत्वान पुरुषाच्या पाठीमागे एक स्त्री कारणीभूत आहे''

उदा. : शिवाजीने स्वराज्य आपल्या आईच्या म्हणण्या नुसार मिळविले, नेपोलियन जे शिकला ते त्याच्या प्रेयसीमुळे त्यांच्या या उत्कट प्रेमानुळेच.

प्रिती ही तरुण मनाला लागलेली तहान आहे. उमलत्या फुलात सुगंधानी यौवनात प्रितीचा नकळत उगम होतो. दोन तरुण जीव एकत्र आले की, हृदयाच्या सतारीवरील भावनांच्या तारा छेडल्या जातात, नी प्रितीचे संगीत सुरु होते जीवन आणि सर्व विश्व आनंदमय वाटू लागते, जीवन आणखीण जगावेसे वाटते पण या जगात कित्येक माणसांची अवस्था अगदी वेगळी आहे जीवनात प्रेमी माणूस नाही म्हणून हजारो लोक तडफतात आणि जीवनात प्रेमी माणूस असून सुद्धा प्रेम करावयास वेळ मिळत नाही असे हजारो लोक आहेत कारण हे जग व्यवहारी आहे आणि व्यवहार हा नेहमी कठोर असतो.

प्रितीच्या साधनेत समाजाच्या संकुचीत आणि बुरसटलेल्या विचारांचे काटे पसरलेले आहेत आणि काट्यांमुळेच जीव रक्तबंबाळ होतो. आपले भविष्य इतरांनी ठरवावे आणि आपण बांधलेले स्वप्नांचे मनोरे धडाधड ढासळून पडावेत यासाखे दुसरे दुःख कोणते असेल ? जर प्रेमी अंतःकरणाने आनंद दाखविणारे बेगडी मुखवटे घालून या व्यवहारी जगात त्या व्यक्तीला वागवावे लागते. म्हणूनच जीवन सोबती असल्यास प्रेमात तडजोड करावीच लागते.

# कणखर नेतृत्व हवे !

राजमहमद देसाई
बी. एस्सी भाग १

मित्रहो ! कोणतेही काम करायचे म्हटले की त्यासाठी कष्ट हे करावेच लागते. आता हेच पहा ना ! आपल कॉलेज ऊभे करण्याचा निर्णय घेतल्यानतंर ते ऊभे करण्यास फार कष्ट ध्यावे लागले ह्याचप्रमाणे आपल्या भारताला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी कित्येकानी कष्ट घेतले, आपल्या प्राणांची आहुती दिली, महात्मा गांधी सारख्या कित्येक थोर पुरुषांनी अहोरात्र कष्ट घेतले कित्येक क्रांतीवीरांनी आपल्या सर्वस्वाचा त्याग केला या क्रांतीवीरांच्या बाबतीत म्हणायचेच झाले तर असं म्हणावे लागेल, ''इन लोगोंने अपनी जान देना पसंद किया, अपने बच्चों को यतीम करना पसंद किया. अपने बिवियोंको बेवा करना पसंद किया, लेकिन अपनी भारतमाता को गुलामी में रखना पसंद नही किया !'' यांच्या कष्टाचे फळ म्हणजे आपल्या भारताला १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले.

स्वातंत्र्यानंतर शिस्तीच्या व कायद्याचे पालन यांच्या अभावमुळे सर्वत्र ''स्वातंत्र्याचा स्वैराचार'' माजलेला दिसून येतो. काश्मिर व पंजाबमध्ये अतिरेक्यांचे थैमान पहावे तिकडे वासनाकांड व हुंडाबळी, बघावे त्या शहरात गुंडांचे हल्ले, जावे त्या वाटेला बलात्कार व चोऱ्या. या सर्वाच्या पाठीमागे जर कोणाचा हात असेल तर तो हात आहे आपल्या 'कायद्याचा' यासाठी आपल्या भारतीय लोकशाही तंत्रातील कायदे प्रथम दुरुस्त करणे फार गरजेचे व आवश्यक आहे. आखाती देशात कायद्ये कडक त्यामुळे शिक्षा ही फार जबरदस्त असतात खुणी माणसांना ताबडतोब फाशी बलात्कार करणाऱ्याचे हात पाय तोडणे अशा शिक्षे मुळे तेथील माणूस हा कायद्याच्या बाहेरील कोणतीही घटना करण्याच्या मार्गाला जात नाहीत. आपल्या भारत देशात इंदिरागांधी, राजीव गांधी या सारख्या राष्ट्रीय नेत्यांची हत्या झाली तरीही आपले भारत सरकार गेली कित्येक वर्षे पुरावे आणि चौकशी याच्याच पाठी लागले आहे जर हे कोठे थांबणार असेल तर तो एकच मार्ग आहे 'कणखर नेतृत्व'

ज्याप्रमाणे अमेरिकेने प्रक्षेपणास्त्राच्या निर्मितीवर बंदी घतली असतानाच आपल्या भारतातील इंदिरा गांधी, राजीव गांधी याच्या कणखर नेतृत्वामुळे व ए.पी.जे अबुल कलाम व त्यांचे मित्र वसंतराव गोवारीकर याच्यासारख्या जेष्ठ व खंबीर शास्त्रज्ञ यांच्यामुळे भारताने उपग्रह प्रक्षेपण आणि प्रक्षेपणास्त्र यांच्या संशोधनात प्रगती करुन 'आकाश' नावाचे प्रक्षेपणास्त्र यशस्वी केले या यशस्वी प्रगतीमुळे भारताने आपल नाव प्रगत राष्ट्राच्या यादीत लावलं.

आज आपल्या कॉलेजला प्राचार्य आणि प्राद्यापक यांचे खंबीर नेतृत्व लाभले आहे. या कणखर अशा नेतृत्वामुळे आपल्या कॉलेजची ख्याती आता सर्वत्र होत आहे, या पुढे ही होत राहिल. याच नेतृत्वामुळे इथे कोणत्याही प्रकारची वाईट प्रवृत्ती आपल डोक वर करणार नाही. अशाच पद्धतीचे नेतृत्व आपल्या भारत देशाला लाभणार असेल तर खरोखर आपला भारत हा प्रगती पथावर पोहचेल आणि ज्यांनी ज्यांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणाचे बलिदान दिले त्या बलिदानाच सार्थक होईल.

# विद्यार्थी संसद - १९९५-९६



कु. वसुंधरा चव्हाण
विद्यापीठ सचिव



धोंडीराम पाटील
बी.ए. भाग ३



कु. संगीता म्हेतर
बी. एस्सी. भाग ३



राजेंद्र पाटील
बी. ए. भाग २



जगदीश पाटील
बी. एस्सी. भाग २



ऋतुराज यादव
बी. ए. भाग १



कु. गजश्री शहा
बी. एस्सी. भाग १



संभाजी कुलकर्णी
क्रीडा प्रतिनिधी



कु. शैलजा काकडे
विद्यार्थिनी प्रतिनिधी



रामचंद्र पाटील
सांस्कृतिक प्रतिनिधी



संदीप कदम
राष्ट्रीय सेवा योजना प्रतिनिधी

# आमचे गुणवंत



पाटील श. आ.
प्रथम श्रेणी बी. ए. भाग १



पाटील सिद्धार्थ शांताराम
बी. ए. भाग १ प्रथम श्रेणी



वारके सं. धो.
बी. ए. भाग १ प्रथम श्रेणी



कांबळे वि. तु.
बी. ए. भाग १ प्रथम श्रेणी



चव्हाण वि. ग.
बी. एस्सी. भाग १ प्रथम श्रेणी



विजयकुमार रामचंद्र रामशे
बी. एस्सी. भाग २ प्रथम श्रेणी



अभिजीत पाटील
बी. एस्सी. भाग २ प्रथम श्रेणी



ढेरे आर. जी.
बी. एस्सी. भाग २ प्रथम श्रेणी



डी. डी. कोमजवार
एम. फील. (गणित)



ना. रा. वारके
बी. ए. भाग ३ प्रथम श्रेणी



संगीता मेहतर
बी. एस्सी. भाग ३ प्रथम श्रेणी

# क्रिडा नैपुण्य १९९५-९६



**संभाजी कुलकर्णी**
क्रॉसकंट्री व ॲथलेटिक्स विद्यापीठ
संघात निवड (चंदीगड)



**सुरेश महेकर**
क्रॉसकंट्री व ॲथलेटिक्स
विद्यापीठ संघात निवड (चंदिगड)



**बाबासो पाटील**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
बास्केटबॉल कर्णधारपदी निवड (इंदौर)



**अशोक फराकटे**
आंतरविभागीय जिमनास्टीक
रोमनरींग दूसरा क्रमांक



**संभाजी पाटील**
आंतरविभागीय ॲथलेटिक्स
स्पर्धेसाठी निवड



**रामचंद्र काशिद**
आंतरविभागीय कुस्ती स्पर्धेसाठी
निवड



**कु. सुजाता माने**
जनरल चॅम्पीयनशीप ९६ मुली



**दत्तात्रय लोंढे**
जनरल चॅम्पीयनशीप ९६ मुले



प्रमुख पाहुणे **मा - जगदीश खेबुडकर**
यांचे मार्गदर्शन तरुणांनी निराशावादी
न होता आशावादी जीवन जगावे.



**मा. के. पी. पाटील**
अध्यक्षीय समारोप
इप्सीत ध्येय साध्य करण्यासाठी
युवकांनी कष्टप्राय जीवन जगावे.



विद्यापीठ बास्केटबॉल कर्णधार
**बाबासो पाटील**
पारितोषिक स्वीकारताना.



सांघिक स्पर्धा पारितोषिके
स्वीकारताना बी.ए. भाग २
चे विद्यार्थी

# गुणगौरव १९९६



शेला पागोटा रंग भरताना



प्रश्न आमचे उत्तर तुमचे



आमचे 'मालवणी' कलाकार



बहुरूपी नामदेव मस्कर

# विविध उपक्रम



मा. नामदेवरावजी चौगले
भितीपत्रक उद्घाटन



रांगोळी प्रदर्शन पाहणी करताना मान्यवर.



पदभ्रमंती मुले



पदभ्रमंती मुली



एन. एस. एस.



एन. एस. एस.



# ।। हिंदी विभाग ।।

तुम वहन कर सको, जनमन में मेरे विचार,
वाणी मेरी चाहिए तुम्हें क्या अलंकार।

▪ पंत

▪ विभागीय संपादक ▪

प्रा. एस. वी. देसाई

# अनुक्रमणिका

## कविताएँ -


| | | | |
|---|---|---|---|
| १) | माँ | अजित फराकटे | बी.ए. -१ |
| २) | मन | सागर मनुगडे | बी.ए. -२ |
| ३) | सबसे अच्छा | राजन शेळके | बी.ए. -२ |
| ४) | औरत | महेश केसरकर | बी.ए. -१ |
| ५) | प्रणाम | गोसावडेकर | बी.ए. -२ |
| ६) | मेरा भारत महान | राजेंद्र शेळके | बी.ए. -२ |
| ७) | तलाश | कु. नेत्रांजली बिल्ले | बी.ए. -३ |
| ८) | फरियाद | एम्. जी मांडवेकर | बी.ए. -१ |
| ९) | कहानी वीनाकी | एन्. एस्. अत्तार | बी.ए. -१ |
| १०) | किसीको क्या दोगे? | कु. निलोफर अत्तार | बी.ए. -३ |
| ११) | तीन बाते | दत्तात्रय साठे | बी.ए. -२ |
| १२) | मंदीर – मस्जिद के नाम | कु. रेहाना जमादार | बी.एस्सी. -३ |
| १३) | मंदीर हमारा | सुरेश पाटील | बी.एस्सी. -१ |
| १४) | माँ | रविंद्र फराकटे | बी.ए. -१ |
| १५) | हिंदुस्थान | नामदेव मस्कर | बी.एस्सी - ३ |


## लेख -


| | | | |
|---|---|---|---|
| १) | पल | उदय पाटील | बी.ए. -२ |
| २) | कबीर | धनाजी पोवार | बी.ए. -३ |
| ३) | लक्ष्मी भक्षक लेखक | अमोल घाटगे | बी.ए. -१ |


☆ ☆ ☆

## माँ

माँ तुम केवल ममता हो
कल तुम्हारे रग रग में
हैं पुण्य कर्म तेरा इतना
कि विश्व झुका तेरे पग में,
तेरे इतने असीम प्यार को
माँ मैं कैसे रख पाऊँगा
त्याग तुम्हारा मुझपर इतना
चुकता कैसे कर पाऊँगा
जितना निश्चल उतना उदार
तेरे हृदय का है खुला द्वार
तेरे चरणोंमें सर की आहुती
अर्पण है माँ बार - बार
अर्पण है माँ बार - बार।

**अजित फराकटे**
बी. ए.- प्रथम वर्ष

## सब से अच्छा

पढना और पढाना अच्छा,
हँसना और दूसरों को हँसाना अच्छा।
आनंद मे तो सब हाथ मिलाते है,
लेकिन दुःख में साथ निभाना अच्छा।
गलती की जो माफी माँगे,
उसकी भूल को भूलाना अच्छा।
दूसरो के आगे रोने से,
अपना दर्द छिपाना अच्छा।
नफरत करो पाप से, लेकिन,
पापी को अपनाना अच्छा।
झूठ बोलना पाप है ,
सच्ची बाते बोलना सब से अच्छा ॥

**शेळके राजन जी.**
बी. ए. - द्वितिय वर्ष

## मन

मन एक चंचल पंछी
राह न उसकी कोई जाने
कभी इधर तो कभी उधर
यह भटकता ही जाए।
बहुत - सी बाते छुँपा सकते है, जग से
मगर, चाहे तो भी कैसे छुपाए मन से
पता नही जाना है कहाँ
इन मन के रास्तों से।
न जाने इन रास्तों की मंजिले है कहाँ
रास्तो में मिलनेवाले है कौन यहाँ
बस जानते है इतना कभी न कभी मंजिल मिलेगी
इसी आशा को मन में रखकर बस जीना है यहाँ।

**सागर मनुगडे**
बी. ए. - द्वितिय वर्ष

## औरत

औरत एक ऐसी चिज है,
जिसे कोई पुरी तरह, अपना नहीं पाया।
औरत एक ऐसी खाई है,
जिसके गहराई को, आज तक कोई जान नहीं पाया।
औरत एक ऐसा सागर है,
जिसे आज तक कोई नाप न पाया
जिसका जवाब आजतक कोई दे नही पाया।
लेकिन,
औरत का-माँ, बहन, बहू, बेटी और पत्नी
यह एक ऐसा नाता है,
जिसे जिंदगी में जिसने न पाया,
समझो उनका जीवन अधूरा रह गया।

**महेश पी. केसरकर**
बी. ए. - प्रथम वर्ष

## प्रणाम

प्रणाम हमारे दूधसाखर महाविद्यालय को
दुःख हो रहा है, हमारे मन को।

शिक्षा के लम्बी सफरमें
कुछ साल बिताएँ दूधसाखर महाविद्यालयमें।

हर साल की नई – नई बातें,
जिंदगीभर आयेगी हमे याद।

अध्यापकोंसे कुछ पाया, कुछ दिया
उनकी रहे हमेशा छत्र छाया।

उनकी वो प्यार भरी मोहब्बत
भूलेंगे न हम जिएंगे जब तक।

रहे न हममें कभी फाँसले
जिससे बढ़ गए हमारे हौसले।

इनसे हमने बडा योगदान पाया
जिन्होने हमको जीवन का रास्ता बताया।

कभी न भूलेंगे हम जीवन में
काम आएगे अगले सफरमें।

आखरी तमन्ना एक ही है।
वादा रहा तुम्हारा हमारा।
सफल होगा जीवन हमारा।

गोसावडेकर
बी. ए – द्विवितिय वर्ष

## मेरा भारत महान

इस भारत में मैं जनमा हूँ,
है मुझे अभिमान ॥ धृ ॥

सदा ऐसे ही कृत्य करुँगा,
जो बढ़ाएँ भारत की शान,
यहाँ के लोग बहुत अच्छे,
भाषाएँ है प्यारी
जिधर भी देखूँ हरी भरी, है जननी सारी ॥ २ ॥

इस धरती पर जनम लिया है,
गांधी, सुभाष ने
शिवाजी जैसे वीर जनमें,
अन्यायों का कष्ट हरने ॥ ३ ॥

महिलाएँ भी ऐसी जनमी
जो करे लोगों के सिर ऊँचे
हर काम न कर ऐसा,
जो करे लोगों के सिर नीचे ॥ ४ ॥

इस भारत में मैं जनमा हूँ
है मुझे अभिमान इसका
भारत है हर दृष्टि से महान
मेरा भारत महान ॥ ५ ॥

राजेंद्र शेळके
बी. ए. – द्विवितिय वर्ष

## तलाश

अँधेरों से भरा हुआ है जीवन,
उजाले की किरण खोजनी है।
भवसागर की बढती है लहरे,
इसे तरने सुख की नैय्या खोजनी है।
बेसूरी हो गयी है दुनिया,
इसमें सूर - ताल खोजना है।
कौंटों से भरी हुयी है जीवन की राह,
इसमे फूलो की खोज करनी है।
नफरत से भरा हुआ है समाज,
एसमें प्यार की खोज करनी है।

कु. नेत्रांजली बिल्ले
बी. ए. - तृतिय वर्ष

---

## फरियाद

सूरज अगर ढलना भूले तो
अँधेरा किससे फरियाद करे ?
लहरे अगर उछलना भूले तो
सागर किससे फरियाद करे ?
बादल अगर बरसना भूले तो
जमीन किससे फरियाद करे ?
कली अगर, खिलना भूले तो
भौंरा किससे फरियाद करे ?

एम. जी मांडवेकर
बी. ए. - प्रथम वर्ष

## कहानी B ना की।

A क लडकी थी।
B ना उसका नाम था।
C तंबर में जन्मी थी।
D म्पल उसकी माँ थी।
E ग्रान उसके पिता थे।
F वाय. बी. ए. में पढती थी।
G तेंद्र उसका भाई था।
H एम्. टी. घडी वो पहनती थी।
I ए. एस्. वह होना चाहती थी।
J लबू उसके चाचा थे।
K दार उनका नाम था।
L आयसी ऑफिस के पास रहते थे।
M ब्रायडरी बहुत अच्छा करती थी।
N सी. सी. की छात्र थी।
O जास्विनी उसकी सहेली थी।
P क्चर देखने का उसे शौक था।
Q बा में उसके नाना थे।
R मी में उसके मामा थे।
S एस्. सी. में वह पहली आयी थी।
T प टॉप से रहती थी।
U सलेस हमेशा कहती थी।
V लन से वह डरती थी।
W व्ही रामन का खेल वह बहुत चाहती थी।
X सरसाईज हमेशा करती थी।
Y बी. चव्हाण उसके प्यारे नेता थे।
Z तक उसकी कहानी समाप्त हुई।

अत्तार एन्. एस्.
बी. ए. - प्रथम वर्ष

## किसीको क्या दोगे ?

प्रेम दो, वासना नही। जान दो, अनजान नही।
सत्य दो, असत्य नही। इज्जत दो, बदनामी नही।
ममता दो, क्रोध नही। समता दो, विषमता नही।
धर्म दो, अधर्म नही। मित्रता दो, शत्रुत्व नही।
पुण्य दो, पाप नही। इन्साफ दो, नाइन्साफी नही।
सहारा दो, फटकारा नही। खुशियाँ दो, ग़म नही।
जीवन दो, मौत नही। संतोष दो, असंतोष नही।
हँसी दो, रोना नही। सुख दो, दुःख नही।
फूल दो, काँटे नही। जीत दो, हार नही।
क्षमा दो, सजा नही। कला दो, बला नही।
उजाला दो, अंधेरा नही। ठंडक दो, आग नही।
नेकी दो, बदी नही। अधिकार दो, हुकुम नही।
जादा दो कम नही।

कु. निलोफर सरदार अत्तार
बी. ए. - तृतिय वर्ष

---

## तीन बाते

इन्सान की जीवन में एक बार मिलती है।
माँ, बाप, और जवानी
याद रखना जरुरी है।
सच्चाई, कर्तव्य और मौत
इन्सान को जलील करती है।
चोरी, चुगली और झूठ
अस्सल उद्देश से रोकती है।
बदचलन, गुस्सा और लालच
निकलकर वापस नही आती।
तीर कमानसे, बात जबानसे और
आत्मा शरीरसे

दत्तात्रय सा. साठे
बी. ए. - द्विवितिय वर्ष

## मंदिर - मस्जिद के नाम

मंदिर के नाम से लूट लिया,
मस्जिद के नाम से लूट लिया,
लूट लिया भाई लूट लिया,
खाली जेब को भर दिया।

मंदिर के नाम से इज्जत लूटी,
मस्जिद के नाम से इज्जत लूटी,
क्या अरे, हम जाने कौन है वो,
किसकी है यह चाल।

मंदिर के नाम से मुस्लिम काटे,
मस्जिद के नाम से हिंदू काटे,
एक ही तलवार से दोनो काटे,
मैं क्या जानू मेरी वजा क्या है ?
मैं क्या जानू मेरी अवकात क्या है ?

राम समझ, रहमान समझ ले,
धर्म समझ, इमान समझ ले,
मस्जिद कैसा, मंदिर कैसा,
ईश्वर का स्थान समझ ले,
कर दोनों की सैर,
बाबा कोई नहीं है गैर।

कु. रेहाना असदखान जमादार
बी. एस्सी - तृतिय वर्ष

## ''मंदिर हमारा''

है ''दूधसाखर'' हम सबका प्यारा
सब कालेजोंमे पढनेको न्यारा
पढकर हम यहाँसे जाएँगे दूर कई
देखनेको यह रंगीन दूनिया नयी
जिसको दुनिया कहे गँवारा
उसको 'दूधसाखर' ने दिया सहारा
यहॉसे निकलेंगे शिवाजी छत्रपती शाहू
जिन्होने हसील की इन्सानियत बहू
शांतता ही उसकी बडी शान
जिसको इंदिराने समझा महान
यहॉसे बहती है ज्ञानगंगा बडी
जिसमें सरस्वती साधना खडी
मैं हूँ ज्ञाननिवास का भँवरा
यहा कॉलेज नही ''मंदिर हमारा''

सुरेश व्ही. पाटील
बी. एस्सी - प्रथम वर्ष

---

## माँ

माँ तुम केवल ममता हो .
कल तुम्हारी रग रग में
है पुण्य कर्म तेरा इतना
कि विश्व झुका तेरे पग में,
तेरे इतने असीम प्यार को
माँ मैं कैसे रख पाऊँगा
त्याग तुम्हारा मुझपर इतना
चुकता कैसे कर पाऊँगा
जितना निश्चल उतना उदार
तेरे हृदय का है खुला द्वार
तेरे चरणोंमें सर की आहुती
अर्पण है माँ बार - बार।

रविंद्र फराकटे
बी. ए.- प्रथम वर्ष

---

## हिंदूस्थान

क्या यही वह हिंदूस्थान है ? क्या यही वह हिंदूस्थान है ?
जिसके खातिर गांधीजीने अपने आप को अर्पण किया।
क्या यही वह हिंदूस्थान है ?
जिसके खातिर कई क्रांतिकारियों ने अपना खून बहाया।
क्या यही वह हिंदूस्थान है ?
जिसके खातिर इंदिराजी, राजीवजीने अपना जीवन दान किया।
क्या यही वह हिंदूस्थान है ?
जिसके खातिर अनेक सिपाहीयोंने अपना जीवन अर्पण किया।
क्या यही वह हिंदूस्थान है ?
जिसके लिए पुत्रों ने अपना देशप्रेम दिखलाया।
क्या यही वह हिंदूस्थान है ?
जिसका सपना गांधीजीने बीते कल में देखा था।
क्या यही वह हिंदूस्थान है। क्या यही वह हिंदूस्थान है।

नामदेव मस्कर
बी. एस्सी - तृतिय वर्ष

# पल

**उदय पाटील**
बी. ए. द्वितीय वर्ष

पल... घटा... दिन... महिने... साल... समयचक्र घुमता रहता है। हरएक पल पिछे रहता है और हम आगे-आगे जाते रहते है। एखाद पल हाथ से घुटा, तो घूटा, एखाद समय छूटा तो छूटा, फिर लौटकर ये पल.... समय, आना असंभव । समयचक्र के भँवर में घुमते-घुमते कोई न कोई राहमें मिल जाता है, पहचान होती है, पास का होता है परंतु समयचक्र में अनाहूत मिला हुआ हाथ धीरे धीरे छूट जाता है । फिर आदमी अकेला हो जाता है। बीते हुए पल वापस लौटना मुश्कील होता है, तब हताश होकर केवल यादोंके सिवाय हाथ में क्या रहता है ?

जीवन याने समाप्त न होनेवाली एक राह है। राह में आदमी का जीवन समाप्त हो जाता है, उसके जीवन की समाप्ती हो होती है । बचे है उनके लिए लंबा चौडा रास्ता बहता ही रहता है। कुछ लोग जीवन से चले जाते है... उनकी यादे रह जाती है... उनकी जगह को फिर हजारो आदमी भी भर नही सकते। लोग अलग होते है किसलिए ? संदेह इसीकारण शंका-संदेह मन मे निर्माण हो जाय तो सारी बिरादरी रिश्ते-नाते झूठ लगने-लगते है, कभी-कभी आँखों से देखी सचाई भी झूठ लगती है। दोस्ती, प्रेम सबकी परिभाषा परिवर्तीत होती है। इसलिए कहता हूँ, संदेह को मन में स्थान मत दो उनकी स्मृतीयाँ, जीना असहाय कर देगी, इससे अपने आपसे दूर रखो उन्हे समय पर ठहराओ । वे पल वे समय निकल जाय तो कुछ नुनाफा नही होगा। बाद में प्रेम के हजारो संदेश भेजे जाय तो वापस लौटते नही।

सुबह होती है, रात निकल जाती है, दिन निकल जाते है । समय किसीके लिए रुकता नही। पल-पल पिछे पड जाते है, आदमी मनसे उन दिनो मे गुँथा होता है उससे बाहर निकलने के पहले ही वे सुनहरे दिन समाप्त होते है और पिछे रह जाती है सिर्फ यादे। परदेपर चित्र बदल जाते है, गया हुआ हरेक दिन रात, सुबह शाम सब एक बार बीत जाय तो लौटकर नही आते।

# कबीर

**धनाजी पोवार**
बी. ए. तृतीय वर्ष

कहते है, नीरु नाम का एक जूलाहा वाराणसी के पास रहता था। उनकी पत्नी का नाम नीमा था। उनकी कोई संतान नही थी। वे बच्चे के लिए प्रतिदिन ईश्वर से प्रार्थना करते थे।

एक दिन नीरु कहीं जा रहा था। रास्ते मे एक तालाब लगा। निरु ने उसके शीतल जल से हाथ-मुँह धोया। कुछ देर विश्राम करने की इच्छा से वह वहीं किनारे पर लेट गया। कुछ ही क्षण बीते होंगे कि नीरु को पासही एक छोटे बच्चे के रोने की आवाज सुनकर उठ बैठा। उसने इधर-उधर देखा, परंतु वहाँ कोई भी नहीं था। बच्चे का रोना नीरु सह न सका। नीरु बच्चे के पास गया। बच्चा भूख से व्याकुल था। नीरु ने बच्चे को उठा लिया। नीरु ने एक बार फिर इधर उधर देखा। अब भी वहाँ कोई नहीं था। वह उसे घर ले आया। नीमा ने इस बालक को देखा, तो वह फूली नही समाई। उसने उसे हृदय से लगा लिया और मन ही मन ईश्वरको धन्यवाद दिया।

नीरु ने इस बालक का नाम 'कबीर' रखा। नीरु और उसके पत्नीने आपनी प्रेम से अच्छा इन्सान बनाया। कबीर बडे होणे के बाद मानव-मानव का भेद नही करते थे। वे चाहते है, की सबके साथ समानता का व्यवहार हो।

'कबीर' ने रामानंद ऐसे महान विद्वान को गुरू बनने को इच्छा प्राप्त हुयी। कबीर की यह इच्छा पूर्ण हूई। गुरुसे ज्ञान प्राप्त कर 'कबीर' प्रेमभाव से लोगोंतक अपनी बात पहुँचाने लगे। कबीर ज्ञानी ही नही लेकिन एक महान कवि भी थे। उनकी कविता का लोगोंके हृदय पर प्रभाव पडा। और कहते है ईश्वर एक है, वह सभी से प्रेम करता है। और वह हमारे हृदय में रहता है। हम सब समान है। न कोई छोटा है, न कोई बडा। दुनिया के सभी इन्सान एक हैं।

# लक्ष्मीभक्षक लेखक

**अमोल घाटगे**
बी. ए. प्रथम वर्ष

भारतेन्दु हरिश्चंद्र का कुछ राजा बड़ा सन्मान करते थे। काशी के राजा तो अनन्य प्रेम करते थे, अंतिम दिनों में जब की वे आर्थिक संकट से गुजर रहे थे, काशी के नरेश ने उनसे कहा – ''बाबू साहब, आपने बड़ा पराक्रम किया। बड़े-बड़े काम किये। पर एक काम सबसे बड़ा यह किया कि घर की लक्ष्मी को खा गए।''

तब भारतेन्दु ने विनम्र भाव से कहा, ''महाराज, इस लक्ष्मी ने मेरे पूर्वजों को खाया है। घर में एक ऐसा भी होना चाहिए, जो इसको खा जाए।

★★★







मा. प्राचार्य समवेत प्रध्यापक वृंद

शिक्षकेत्तर कर्मचारी समवेत मा. प्राचार्य





संपादक मंडळ

विद्यार्थी शिक्षक दिन





प्राचार्यासमवेत बी. ए. भाग ३ चे विद्यार्थी - विद्यार्थीनी शिक्षक

प्राचार्या समवेत. बी. एस्सी. भाग ३ चे विद्यार्थी - विद्यार्थिनी शिक्षक



# || ENGLISH SECTION ||

Some books are to be tasted,
Others to be swallowed,
and
Some few to be chewed and digested.

■ Franics Bacon

■ Sectional Editor ■
Prof. Shrikrishna Salokhe

# INDEX


## PROSE -

| | | |
|---|---|---|
| 1) Eduction and Today's Education system | Subhash Mahekar | B.A. III |
| 2) AIDS : Human Enemy | D. A. Desai | B.Sc. III |
| 3) We and Ultra - Violet Rays | S. A. Joshi | B.Sc. III |
| 4) Hello Computers ! | Sarita Powar | B.A. III |
| 5) Women of Contem Porary Age | Vasundhara Chavan | B.A. III |
| 6) Introduction to Strange Plant | Vinod Sale | B.Sc. III |
| 6) Subramanyan chandrasekhar Rembered | K. M. Tashildar | B.Sc. III |

## POETRY -

| | | |
|---|---|---|
| 1) Love's Enfoldment | Rituraj Yadav | B.A. I |
| 2) A Plea to ...... | Subhas Mahekar | B.A. III |
| 3) A Game Of Cricket | D. B. Patil | B.Sc. III |
| 4) Friendship | Swapnali Patil | B.A. III |
| 5) Hope | Namdev Majkar | B.Sc. III |
| 6) Man | Ajit Farakate | B.A. I |

## MISCELLANEOUS -

| | | |
|---|---|---|
| 1) Character | Rehna Jamadar | B.Sc. III |
| 2) The Greatent Things | D. D. Warake | B.A. I |
| 3) What Is Life | P. R. Dalvi | B.Sc. III |
| 4) What is Impossible With Money | Datta Patil | B.Sc. III |
| 5) Shastris Tuesday | Amol Ghatage | B.A. I |



# POEMS

## LOVE'S ENFOLDMENT

May all the joy of each new day,
Greet you with the rising sun;
And may it wrap you close.
Until the day is done.

May love and happiness be yours,
Each moment..... each hour,
May friendship's warmth and glow
Bud in your heart and flower.

May you share your many blessings
With some one else along the way,
For thus you will find the beauty
And the joy of each new day.

- Rituraj Yadav
B. A. Part - I

## A PLEA TO-

Oh ! return to us Again,
